# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२२

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**राज्यातील नक्षलग्रस्त भागाच्या विकासासाठी केंद्र शासनाने राज्यशासनास निधी देण्याबाबत**

**(१) ३२४९३ (०७-०१-२०२२). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.चिमणराव पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नक्षली कारवाई विरोधात लढण्यासाठी तसेच नक्षलग्रस्त भागाच्या विकासासाठी केंद्र शासनाने राज्य शासनाला १२०० कोटीचा निधी द्यावा अशी मागणी केंद्रीय गृहमंत्री यांच्याकडे राज्याचे मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक २६ सप्टेंब, २०२१ रोजी वा त्यासुमारास झालेल्या बैठकीत केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चंद्रपूर-गडचिरोली या नक्षलग्रस्त जिल्हयातील नक्षली कारवायांचा बिमोड करण्यासाठी उक्त निधीतून कोणत्या उपाययोजना व पोलीस खात्याचे सक्षमीकरण करण्यात येणार आहे काय, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने निधी उपलब्ध होण्याबाबत कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (०४-०३-२०२२) :** (१) होय, राज्य शासनाला रु. ११२५ कोटी इतका निधी द्यावा, अशी मागणी केली आहे.

(२) गडचिरोली जिल्हा नक्षलग्रस्त व जंगलव्याप्त असून दुर्गम भाग व दळणवळणाच्या अभावामुळे नक्षलवाद्यांना आपले अस्तित्व ठेवण्यास मदत होत आहे. पोलीस विभागाकडून जिल्हयाचे सक्षमीकरण करण्यासाठी, दुर्गम भागातील नागरिकांचे विकासासाठी विविध उपक्रमांद्वारे प्रयत्न करण्यात येत आहेत. नक्षलविरोधी अभियान व दळणवळण सुविधा बळकट करुन संवेदनशील भागाचा विकास साधण्यासाठी महत्वाचे रस्ते/पूल तसेच जिल्हयातील महत्वाचे रस्ते-पूल, तालुका-जिल्हा व इतर राज्य सीमा जोडण्यासाठी फेज-२, RCPLWE, RRP-२ अंतर्गत रु. ९८० कोटी तसेच स्वतंत्र मोठे चार पूल बांधण्यासाठी रु. १४५ कोटी असे एकूण रु. ११२५ कोटीचे प्रस्ताव राज्य शासनामार्फत केंद्र शासनास मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

(३) दि. २६ सप्टेंबर, २०२१ रोजी केंद्रीय गृहमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली नक्षलग्रस्त राज्यांच्या मुख्यमंत्री सोबतच्या बैठकीत मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी नक्षली कारवाई विरोधात लढण्यासाठी तसेच नक्षलग्रस्त भागाच्या विकासासाठी राज्य शासनाला रु. ११२५ कोटी इतका निधी द्यावा अशी मागणी केली आहे.

स्वतंत्र मोठे ४ पूल बांधणीचा रु. १४५ कोटीच्या प्रस्तावास केंद्र शासनाने दि. १३/१०/२०२१ च्या पत्रान्वये तत्वत: मान्यता दिलेली आहे. तसेच फेज-२, RCPLWE, RRP-२ अंतर्गत रु. ९८० कोटीच्या प्रस्तावास अद्याप मान्यता मिळालेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सातारा जिल्ह्यातील नऊ तालुक्यांत क्रीडा अधिकारी पद रिक्त असल्याबाबत

**(२) ३२५१७ (०६-०१-२०२२). श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्ह्यात अकरा तालुक्यांपैकी केवळ कराड व खटाव तालुक्यात क्रीडा अधिकारी हे पद भरण्यात आले असून सातारा, कोरेगांव, जावळी, पाटण, फलटण, माण, वाई, महाबळेश्वर व खंडाळा या तालुक्यांतील क्रीडा अधिकाऱ्यांची पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पदे कधीपासून रिक्त आहेत व रिक्त असलेली पदे त्वरीत भरण्याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुनिल केदार (०२-०३-२०२२) :** (१) हे खरे नाही.

सातारा जिल्ह्यासाठी, तालुका क्रीडा अधिकारी संवर्गात ३ पदे मंजूर असून त्यापैकी फ़लटण येथील तालुका क्रीडा अधिकारी पद रिक्त आहे.

(२) तालुका क्रीडा अधिकारी संवर्गातील सरळसेवेची रिक्त पदे भरण्यासाठी, महाराष्ट्र लोकसेवा आयोगास, मागणीपत्र पाठविण्यात आले आहे तसेच पदोन्नतीच्या कोट्यातील पदे भरण्यासंदर्भातील कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील पंतप्रधान शेतकरी सन्मान निधी योजनेतील शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य न मिळाल्याबाबत

**(३) ३२७३४ (०५-०१-२०२२). श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर), श्री.सुनिल भुसारा (विक्रमगड), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.राजेश नरसिंगराव पाटील (चंदगड), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.संजयमामा शिंदे (करमाळा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पंतप्रधान शेतकरी सन्मान निधी योजनेतील शेतकऱ्यांना महसूल व कृषी

विभागाच्या वादामुळे पोर्टलवर नावे असताना त्यांना आर्थिक सहाय्य मिळाले नसल्यामुळे जळगांव जिल्हयातील अनेक शेतकऱ्यांना महसुल विभागाच्या अधिकाऱ्यांनी अपमानित केले असुन राज्यातील अनेक शेतकऱ्यांना सदर योजनेअंतर्गत काही हप्ते मिळाल्यानंतर तांत्रिक कारणास्तव पुढील हप्ते बंद झाल्याचे दिनांक १२ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पंतप्रधान शेतकरी सन्मान योजनेसंदर्भातील तलाठी पटवारी स्तरावरील १०० टक्के काम पूर्ण झालेली असुन सदर योजनेतील तांत्रिक अडचणीसंदर्भातील कामे कृषी विभागाने करावीत अशी मागणी अध्यक्ष, म.रा.तलाठी पटवारी मंडळ यांनी शासनाकडे केली तसेच पंतप्रधान शेतकरी सन्मान योजनेची जबाबदारी कृषी विभागाची असल्याचे मा. कृषी मंत्री महोदयांनी जाहीर केल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी सदर योजनेतील तांत्रिक अडचणीसंदर्भात शासनाने चौकशी करुन योजनेतील त्रुटी व दोष दूर करुन शेतकऱ्यांना योजनेचा लाभ मिळण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (०४-०३-२०२२) :** (१) हे खरे नाही.

(२) शासनाने दि. १५.०२.२०१९ च्या शासन निर्णयानुसार कामे करण्याचे निर्देश दिले आहेत.

(३) या अनुषंगाने मा. मंत्री, महसूल व मा. मंत्री, कृषि यांच्या उपस्थितीत दि. २१.०९.२०२१ रोजी आयोजित बैठकीमध्ये राज्यशासनाच्या परिपत्रक क्र.किसयो-२०१९/प्र.क्र.२०/११अे, दि.०४.०२.२०१९ व शासन निर्णय क्र. किसयो-२०१९/प्र.क्र.२०/भाग-४/११अे, दि. १५.०२.२०१९ नुसार सर्व यंत्रणांनी समन्वयाने कामकाज करावे असे निर्देश देण्यात आले आहेत.

राज्यात दि.३१.१.२०२२ अखेर एकुण १०९.३० लाख पात्र शेतकऱ्यांना एकुण रक्कम रु. १८,१११.०९ कोटी थेट लाभ हस्तांतरण द्वारे बँक खात्यात जमा करण्यात आलेली आहे. तसेच उर्वरीत पात्र लाभार्थी शेतकऱ्यांना निधी वितरीत करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गोवंडी (मुंबई) येथे अनधिकृतपणे गॅस रिफलिंग करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(४) ३२९२५ (१०-०१-२०२२). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोवंडी (मुंबई) येथे दाटवस्तीत अनधिकृतपणे गॅस रिफलिंग कारखान्यात गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांनी कारवाई करून पाच जणांना अटक केल्याचे दिनांक १६ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी संबंधित आरोपींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (०४-०३-२०२२) :** (१) व (२) गोवडी मुंबई येथे दाट लोकवस्तीच्या परिसरात अवैधरित्या गॅस सिलेंडर मधून पाईपद्वारे गॅस काढून लहान सिलेंडरमध्ये गॅस भरत असल्याची तक्रार प्राप्त झाल्याने शिवाजीनगर पोलीस ठाणे, मुंबई येथे गु.र.क्र. ८४६/२०२१ कलम २८५, २८६, ३३६, ४२०, ३४ भा.दं.वि. सह जीवनाश्यक वस्तु कायदा ३,७ सह पुरवठा व वितरण नियमन आदेश २००० कलम ३,४,६,७ अन्वये सहा जणांवर गुन्हा दाखल करुन अटक करण्यात आले. सदर प्रकरणी पुढील तपास सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर येथील तत्कालीन उपवनसंरक्षक (प्रादेशिक)**
**यांनी पदाचा केलेल्या गैरवापराबाबत**

**(५) ३३०१५ (११-०१-२०२२). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर येथील तत्कालीन उपवनसंरक्षक (प्रादेशिक) श्री.एस.जी.धुमाळ यांचे सेवा कालावधीमध्ये झोलल्या सर्व कामांची चौकशी करून त्यांचेवर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी मा.लोकप्रतिनिधी यांनी मंत्री वने यांना दि.१७ डिसेंबर, २०२० रोजी पत्रान्वये केली असून त्या अनुषंगाने शासनाचे दि.१२ जानेवारी, २०२१ रोजीचे प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) नागपूर यांना आदेशीत केलेल्या पत्राच्या अनुषंगाने चौकशी अहवाल तात्काळ शासनास सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय ,तसेच चौकशी पुर्ण झाली असल्यास चौकशी अहवाल शासना सादर केला आहे काय,
(३) असल्यास, श्री.धुमाळ यांचेवरील चौकशी अहवालानुसार त्यांचेवर शासनाकडून कोणती कारवाई केली आहे, त्याची सद्यस्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. उद्धव ठाकरे (०३-०३-२०२२) :** (१) अंशत: खरे आहे.
मा. लोकप्रतिनिधी यांचेकडील पत्र क्रमांक २६५/२०-२१, दिनांक १५/०७/२०२० अन्वये तत्कालीन मा. मंत्री (वने) यांना सदर मागणी करण्यात आली आहे.
(२) या बाबत मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), कोल्हापूर यांचेकडुन दिनांक २३/०७/२०२० व दिनांक ११/०२/२०२२ रोजीचा चौकशी अहवाल तसेच प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांच्या दिनांक ०३/०९/२०२१ रोजीच्या पत्रासोबत अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (मुख्यालय), सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे तथा पालक अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कोल्हापूर वनवृत यांचा दिनांक १३/०८/२०२१ रोजीचा चौकशी अहवाल प्राप्त झाला आहे.
(३) उक्त अहवालानुसार श्री. धुमाळ हे उपवनसंरक्षक (प्रा.), कोल्हापूर या पदावर कार्यरत असतांना त्यांचे स्तरावरुन लाकूड वाहतूकीसाठी वाहतूकपास देण्यात आलेले नसून त्यांच्या

अधिकाराचा गैरवापर केलेला नाही. मा. लोकप्रतिनिधी यांच्या पत्रात नमुद केलेल्या बाबी या वनपरिक्षेत्र अधिकारी यांच्या स्तरावरील असुन यामध्ये दिनांक ११/०२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त झालेल्या सविस्तर माहितीमध्ये देखील श्री. धुमाळ यांनी अथवा इतर वनपरिक्षेत्र अधिकारी यांनी काही गैरप्रकार केलेला आढळुन आलेला नसून याबाबत इतर कोणतेही पुरावे प्राप्त झालेले नसल्याने सदर अर्ज दफ्तरी दाखल करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही

---

### अहमदपूर (जि.लातूर) तहसील कार्यालय परिसरात कृषी विभागाचे कार्यालय उभारण्याबाबत

**(६) ३३०३२ (०६-०१-२०२२). श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदपूर (जि.लातूर) तालुक्यातील कृषी विभागाचे कार्यालय भाडे तत्वावर असलेल्या इमारतीत सुरु असल्यामुळे तेथील अधिकारी व कर्मचारी तसेच विविध कामांनिमित्त येणाऱ्या नागरीकांची गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अहमदपूर तहसील कार्यालयाच्या परिसरात जागा असून सदर रिक्त जागेचा वापर शासनाने कृषी कार्यालयासाठी करण्याची मागणी नागरीकांनी वारंवार केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने अहमदपूर तहसील कार्यालय परिसरात कृषी विभागाचे कार्यालय उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (०४-०३-२०२२) :**(१) (२) व (३) करिता

तालुका कृषि अधिकारी, अहमदपूर जि.लातूर या कार्यालयास शासकीय इमारत उपलब्ध नाही. सद्यस्थितीत सदर कार्यालय अहमदपूर नगरपरिषद हद्दीतील नांदेड रोड, अहमदपूर येथील भाडे तत्वावरील खाजगी जागेत कार्यरत आहे. तालुका कृषि अधिकारी, अहमदपूर कार्यालयाचे सध्याचे ठिकाण मध्यवर्ती बसस्थानकाच्या उत्तरेस सुमारे १ किलोमीटर अंतरावर असून या कार्यालयाबाबत समस्या असल्याबाबत कामानिमित्त येणाऱ्या नागरिकांनी लेखी कळविल्याचे आढळून येत नाही तसेच अहमदपूर तहसील कार्यालय परिसरात कृषी विभागाचे कार्यालय उभारण्याची कोणतीही मागणी नागरिकांनी केल्याचे आढळून येत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### राज्यातील स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांना शासकीय सेवेत सामावुन घेण्याकरीता

**(७) ३३०६८ (११-०१-२०२२). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.महेंद्र दळवी (अलिबाग) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांना शासकीय सेवेत सामावुन घेण्याकरीता मा.राज्य मंत्री सामान्य प्राशासन विभाग यांच्या समवेत दिनांक.१६ फेब्रुवारी, २०२१ व दिनांक १५ सप्टेंबर, २०२१ रोजी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सामन्य प्रशासन विभागाचा दिनांक ०४.०३.१९९१ रोजीच्या शासन निर्णयानुसार स्वातंत्य सैनिकांच्या पाल्यांना शासकीय सेवेत सामावुन घेण्याकरीता भरती प्रक्रिया राबविण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे काय, असल्यास त्याची सध्यस्थिती काय आहे काय,
(३) असल्यास, ज्या स्वातंत्र्य सैनिकांनी आपल्या प्राणांची आहुती देवुन जिवाची बाजी लावली अशा स्वातंत्रय सैनिकांच्या पाल्यांना शासन केव्हा पर्यंत शासन सेवेत सामावुन घेणार आहे, तसेच महाराष्ट्रामध्ये सध्या हयात असणा-या स्वातंत्र सैनिकांची व त्यांच्या पाल्यांची आकडेवारी जिल्हानिहाय काय आहे,
(४) नसल्यास, विलबांची करणे काय आहेत?

**श्री. उद्धव ठाकरे (०२-०३-२०२२) :** (१) होय.
(२) (३) व (४) स्वातंत्र्य सैनिक/त्यांचे नामनिर्देशित पाल्य यांना शासकीय सेवेमध्ये वर्ग-३ व वर्ग-४ च्या पदावर नियुक्ती देणेबाबत दि.१२ ऑक्टोबर, १९६५ च्या परिपत्रकान्वये काही सवलती देण्यात आल्या आहे.

दि.४.३.१९९१ रोजीच्या परिपत्रकान्वये स्वातंत्र्य सैनिक /त्यांचे नामनिर्देशित पाल्य यांना शासकीय सेवेतील महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील वर्ग-३ व वर्ग-४ मधील पदांवर नोकरी देण्याबाबत वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशांचे एकत्रिकरण करण्यात आले आहे. त्यामध्ये स्वातंत्र्य सैनिक/त्यांचे नामनिर्देशित पाल्य यांना पसंतीक्रम देण्यात आला आहे.

तद्नंतर शासन निर्णय क्र.प्रानिमं-२००७/प्र.क्र.४६/०७/१३-अ, दि.२७ जून, २००८ अन्वये समान गुणाच्या निकषावर गुणवत्ता क्रम विहित करण्यात आला आहे. त्यामध्ये स्वातंत्र्य सैनिकाचे पाल्य पाचव्या क्रमांकावर निश्चित करण्यात आले आहे.

तात्पुरत्या/अस्थायी नियुक्त्या नियमित करण्याच्या अनुषंगाने मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल झालेल्या सिव्हील अपील क्र.१४१३/२००३ व इतर १० याचिकांप्रकरणी "शासकीय, निमशासकीय व सार्वजनिक उपक्रमामध्ये पदे भरताना नियुक्ती विहित मार्गाने करणे शासनावर बंधनकारक आहे. विहित कार्यपद्धती व नियमांचे पालन न करता मागीलदाराने अनियमितपणे केलेल्या नेमणूका नियमित करण्यात येऊ नयेत" असे स्पष्ट निर्देश दिले आहेत.

तसेच, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण येथे दाखल झालेल्या मुळ अर्ज क्र.१२४/२०१४ मध्ये उपरोक्त नमूद दि.२७ जून, २००८ रोजीच्या शासन निर्णयान्वये विहित केलेला प्राधान्यक्रम हा संविधानातील अनुच्छेद १४ व १६ मधील तरतूदींशी सुसंगत नसल्याचे महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाने नमूद केले आहे.

तर, याच तरतुदीसंबंधात मा. उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ यांनी रिट याचिका क्र.४७२३/२०१३ यामध्ये समान गुण मिळालेल्या उमेदवारांचा गुणवत्ताक्रम निश्चित करण्यासाठी सध्याचा प्राधान्यक्रम रद्द करुन वयाच्या आधारे गुणवत्ताक्रम ठरविण्यात यावा अशा आशयाचे आदेश पारित केले आहेत. सदर न्यायनिर्णयानुसार दि.५.१०.२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये पसंतीक्रम रद्द करण्यात आला.

स्वातंत्र्य सैनिक व त्यांच्या पाल्यांची जिल्हानिहाय आकडेवारी संकलित करण्यात आली असून, महाराष्ट्रामध्ये सध्या ४०९५ राज्य शासन स्वातंत्र्य सैनिक व २१३४ केंद्र शासन स्वातंत्र्य सैनिक हयात असून, पाल्यांची संख्या ९९७८ एवढी आहे. स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांना सेवेत सामावून घेणे ही धोरणात्मक बाब असल्याने प्राप्त माहितीच्या अनुषंगाने प्रस्ताव तपासण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

**डोंगरी (मुंबई) येथे चंदनाप्रमाणे सुगंधित आगखूड पोलीसांनी जप्त केल्याबाबत**

**(८) ३३०७९ (०६-०१-२०२२). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंगरी (मुंबई) येथे चंदनाप्रमाणे सुगंधित आणि परवानगीशिवाय तोडण्यास मनाई असताना ५७ लाखांचे आगखूड आणि त्यापासून तयार करण्यात आलेले तेल मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेने छापा टाकून दिनांक २७ जुलै, २०२१ रोजी वा त्यासुमारास जप्त केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे,

(३) असल्यास, त्यानुसार संबंधितांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (०३-०३-२०२२) :** (१), (२) व (३) बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या अधिपत्याखालील डोंगरी पोलीस ठाणे हद्दीतील सेंट्रल हाऊस, निशाणपाडा, चिंचबंदर रोड, डोंगरी, मुंबई येथे प्रतिबंधित वनसंपदा अगार वुडचा बेकायदेशीर साठा केला असल्याबाबत प्राप्त झालेल्या माहितीनुसार दि.१७ जुलै, २०२१ रोजी गुन्हे प्रकटीकरण शाखा, कक्ष १ यांनी छापा टाकून कारवाई केली. त्यानुषंगाने गुन्हे प्रकटीकरण शाखा वि. स्था. गुन्हा रजिस्टर क्र.२३/२०२१, भारतीय वन अधिनियम १९२७ कलम ४१, ४२ सह महाराष्ट्र वन नियमावली २०१४ नियम ३१ व ८२ (डोंगरी पोलीस ठाणे येथील गुन्हा रजिस्टर क्र. ३१/२०२१) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर प्रकरणी दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे. यामध्ये रु.४६,४६,००८/- किंमतीचे वुड ऑईल व रु.१०,५१,५००/- किंमतीचे आगार वुड ऑईल व आगार वुड जप्त करण्यात आले आहे. सदर प्रकरणी पुढील तपास चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही

---

**खुपरी (जि.वाडा) येथे भेसळयुक्त डिझेल साठा जप्त केल्याबाबत**

**(९) ३३२०५ (१०-०१-२०२२). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खुपरी (जि.वाडा) येथे ओम पेट्रोल स्पेशालिटीज कंपनीत सोलापूर पोलिसांनी धाड टाकून १७ कोटी २१ लक्ष रुपयांचे भेसळयुक्त डिझेलसाठा दिनांक १९ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास जप्त केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (०३-०३-२०२२) :** (१) व (२) खुपरी ता.वाडा, जि.पालघर येथे साई ओम पेट्रो स्पेशलिटीज लि.या नावाच्या कंपनीमध्ये दि.१९/१०/२०२१ रोजी धाड टाकलेली नसून दि.१७/१०/२०२१ रोजी पुणे-हैदराबाद महामार्गावर सोलापूर येथे अवैधरित्या टँकरमधून डिझेल सदृश्य ज्वलनशील द्रव पदार्थ टँकरमधून बसमध्ये भरत असल्याचे निदर्शनास आल्याने कारवाई करण्यात आली. त्यानुषंगाने फौजदार चावडी पोलीस ठाणे, सोलापूर शहर येथे दाखल गु. र. नं. ६९८/२०२१ अत्यावश्यक वस्तु अधिनियम -१९५५ चे कलम ३ व ७ सह भारतीय दंड संहिता कलम-३७९, २८५, २८७, ३३६, ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ३४ अन्वये पुढील तपासात कारवाई केली आहे. सदर गुन्हयाच्या तपासात घटनास्थळी आढळून आलेले लोखंडी टँकर, जमिनीतील लोखंडी टाक्या, प्लास्टीक टाक्या यामध्ये असलेला द्रव पदार्थ हा डिझेल सदृश्य पदार्थ तयार करण्यासाठी वापरला गेला असल्याचा दाट संशय निर्माण झाल्याने कार्यवाहीत एकूण रू.१७,२२,३०,०००/ किंमतीची मालमत्ता जप्त/ताबा करण्यात आली आहे.सदर ठिकाणी पुरावा नष्ट होवू नये व त्याठिकाणची परिस्थिती सुरक्षीत रहावी या कारणासाठी कंपनी आवार ताब्यात घेवून सिल केले आहे. तपासाच्या दरम्यान नमूद कंपनीतील टाक्यांमध्ये व टँकरमध्ये असलेल्या द्रव पदार्थांचे नमूने न्याय वैज्ञानिक प्रयोगशाळा येथे पाठविण्यात आले असून त्याबाबत तपासणीचा अहवाल अद्याप प्राप्त झालेला नाही.

(३) सदर प्रकरणात प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे प्राधान्याने दखल घेवून कायदेशीर कार्यवाही केली आहे. आज पर्यंतच्या तपासात बसेस, टँकर, त्याचप्रमाणे कंपनीतील मालमत्ता असा एकूण रू.१७,२२,३०,०००/- माल जप्त/ ताबा करण्यात आला आहे. गुन्हयाचे तपासकामी ०९ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. आज पर्यंत केलेल्या तपासात सर्व आरोपींनी स्वत:च्या आर्थिक फायद्यासाठी संगनमताने डिझेल सदश्य पदार्थाची बेकायदेशीर मार्गाने विक्री करून गुन्हा केले बाबत ठोस पुरावा मिळून आला आहे.गुन्हयाचा पुढील तपास सुरू आहे.

(४) सदर प्रकरणात गुन्हा दाखल किंवा तपास प्रक्रियेत विलंब नाही.

---

**(ता.भूसावळ, जि.जळगांव) येथील रस्त्यांची कामे**
**प्रलंबीत असल्याबाबत**

**(१०) ३३२९६ (११-०१-२०२२). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भूसावळ तालूक्यासह जळगांव जिल्हयातील रस्त्यांच्या कामाना निधी उपलब्ध न झाल्यामुळे रस्त्यांची कामे गेल्या वर्षभरापासून प्रलंबीत आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बाबींची शासनस्तरावरुन चौकशी करण्यांत आलेली आहे काय किंवा करण्यांचे निश्चीत केले आहे,

(३) असल्यास, वरील कामांसाठी शासन किती कालावधीत निधी उपलब्ध करुन देणार आहे,

(४) असल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहे?

**श्री. अशोकराव चव्हाण (२३-०२-२०२२) :** (१) हे खरे नाही.

(२) (३) व (४) कामाच्या प्रगतीनुसार व उपलब्ध तरतुदीच्या मर्यादेत निधी शासनामार्फत उपलब्ध करून देण्यात येतो.

---

## भुसावळ नगरपरिषद कार्यक्षेत्रातील प्रधानमंत्री आवास योजनाअंतर्गत बांधकामाचा हप्ता मिळणेबाबत

**(११) ३३३०१ (११-०१-२०२२). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत भुसावळ नगरपरिषद योजना राबवत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बांधकामाचा २ रा व ३ रा हप्त्याची मागणी मुख्य अभियंता-२ म्हाडा कार्यालयाच्या मार्गदर्शनानुसार विहित नमुन्यात प्रस्ताव पाठविलेला आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने सदर हप्ता लवकरात लवकर मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. जितेंद्र आव्हाड (०२-०३-२०२२) :** (१) होय. केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत भुसावळ शहराकरिता ७३०८ घरकुलांचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. त्यापैकी ५३५० घरकुलांना केंद्रीय मान्यता व संनियंत्रण समितीने (CSMC) मंजूरी दिली आहे
(२) व (३) प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत भुसावळ नगर परिषदेच्या केंद्रीय मान्यता व संनियंत्रण समिती (CSMC) मंजूरी प्राप्त ३५० घरकुलांना राज्य हिश्यापोटी १४० लक्ष इतका निधी वितरित करण्यात आला आहे. एकूण मंजूर ३५० घरकुल लाभार्थ्यांपैकी फ़क्त १०१ लाभार्थी अनुदान घेण्यास इच्छुक असून सदर १०१ लाभार्थी प्रमाणे सुधारित सविस्तर प्रकल्प अहवाल CSMC मंजूरी साठी सादर करण्याकरिता भुसावळ नगरपरिषदेने म्हाडा प्राधिकरणाला दिनांक २९.०७.२०२१ च्या पत्रान्वये हमी दिली आहे. त्यानुषंगाने प्रस्तावित सुधारीत DPR प्रमाणे राज्य शासनाच्या हिश्श्यापोटी वितरीत केलेले जास्तीचे अनुदान रुपये ३९ लक्ष परत घेण्याचे तसेच, प्रस्तावित सुधारीत DPR प्रमाणे १०१ लाभार्थ्यांना केंद्र शासनाच्या पहिल्या हप्त्यापोटी मंजूर निधी रुपये ६०.६० लक्ष वितरीत करण्याची प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उदभवत नाही.

---

## (मौजे रोहीतळ, ता.गेवराई, जि.बीड) येथील लेंडी नदीवरील पूल अतिवृष्टीमुळे वाहून गेल्याबाबत

**(१२) ३३३४७ (११-०१-२०२२). श्री.लक्ष्मण पवार (गेवराई) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) (मौजे रोहीतळ, तालुका गेवराई) जिल्हा बीड जवळून वाहणा-या लेंडी नदीवरील प्रजमा २० वरचा पूल अतिवृष्टीमुळे आलेल्या पूरामध्ये पूर्णपणे वाहून गेल्यामुळे रोहितळसह अनेक गावांना जोडणारा, हा प्रमुख मार्ग बंद झाला आहे. हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रोहितळ गावासह परिसरातील नागरीकांनी पूलावरुन वाहणा-या पुराच्या पाण्यात उतरुन आपला जीव धोक्यात घालून आंदोलन केले. मात्र प्रशासनाने या आंदोलनाची गंभीर दखल न घेतल्यामुळे नागरिक संतप्त झाले होते, आंदोलकांनी नागरीकांची समस्या ऐकूण घेण्यासाठी व निवेदन स्विकारण्यासाठी प्रमुख प्रशासकीय अधिका-या ऐवजी प्रशासनाने पाठविलेल्या कारकून व शिपायाला निवेदन न देताच परत पाठवून आंदोलन सुरु ठेवल्याचेही निदशर्नास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागरीकांच्या आंदोलनाकडे दुर्लक्ष करणा-या प्रशासकीय अधिका-यांवर कार्यवाही करण्याबरोबरच मौजे भोजगांव येथील वाहून गेलेल्या पूलामुळे ज्या दुर्घटना घडल्या त्याची पुनरावृत्ती रोहितळजवळील लेंडी नदीवरील पूल वाहून गेल्यामुळे होऊ नये यासाठी येणा-या पावसाळयापूर्वी सदर पूलाच्या निर्मितीसाठी शासनाने काय उपाययोजना केली आहे किंवा करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय?

**श्री. अशोकराव चव्हाण (२४-०२-२०२२) :** (१) सदरचा पूल अतिवृष्टीमुळे क्षतिग्रस्त झाला होता हे खरे आहे. तथापि या ठिकाणी पाण्याचा प्रवाह कमी झाल्यावर मुरुमाचा भराव करुन रस्ता वाहतुकीस सुरळीत करण्यात आला आहे.
(२) गावकऱ्यांनी दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने संबंधित उप अभियंता व शाखा अभियंता यांनी रोहितळ गावाजवळ प्रत्यक्ष पुलाचे ठिकाणी आंदोलन करणाऱ्या गावकरी यांना भेटून पाण्याचा प्रवाह कमी होताच, वाहतूक सुरळीत करण्यासाठी तात्पुरती दुरुस्ती करण्यात येईल असे निदर्शनास आणले.

त्यानंतरही गावकऱ्यांनी आंदोलन सुरुच ठेवल्यामुळे संबंधित अधीक्षक अभियंता यांचे प्रतिनिधी यांच्याशी प्रत्यक्ष झालेल्या चर्चेअंती गावकऱ्यांनी आंदोलन समाप्त केले.
(३) भविष्यात दुर्घटना टाळणेकरीता सदर ठिकाणी पुरहानी दुरुस्तीअंतर्गत मंजूर कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण करुन पावसाळयापूर्वी काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जिंतूर ते वझर (जिल्हा परभणी) येथील पुलाच्या कामाचे चौकशी करणेबाबत

**(१३) ३३३७० (११-०१-२०२२).श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी जिल्ह्यात जिंतूर ते वझर रस्त्यावरील दोन ठिकाणी सार्वजनिक बांधकाम विभाग अंतर्गत पुलाचे काम दोन महिन्यापूर्वी करण्यात आले होते मात्र सदर काम अत्यंत खराब व निकृष्ट दर्जाचे झाले असल्याचे ऑक्टोबर, २०२१ च्या दरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, असोला पाटी ते वझर तसेच संक्राळा येथील पुलांचा प्रामुख्याने समावेश असल्याचे समजते हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासन सदर कामांची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करणार काय,
(४) नसल्यास, कारवाई बाबत विलंबाची कारणे काय ?

**श्री. अशोकराव चव्हाण (२४-०२-२०२२) :** (१) हे खरे नाही.

जिंतुर ते वझर प्रजिमा-३ वरील सा. क्र. १५/३०० मधील मंजूर नळकांडी पुलाचे काम पुर्ण करण्यात आले असून पोच मार्गाचे काम प्रगतीत आहे.

जिंतुर ते वझर प्रजिमा-४ वरील साखळी क्र. १९/८०० मधील मंजूर नळकांडी पुलावरील विअरिंग कोट चे काम पुर्ण करण्यात आले आहे.

दोन्ही कामे करारनाम्यातील निकषाप्रमाणे करण्यात आली आहेत.

(२) असोला पाटी ते वझर व संक्राळा येथील पुलमोरीची कामे प्रजिमा-५ वर मंजूर आहेत. सा. क्र. ५/६०० व १०/३०० वरील दोन्ही पुल मो-याची कामे सुस्थितीत आहेत. पुल मोरीच्या ठिकाणी किरकोळ स्वरुपाची कामे सद्यस्थितीत प्रगतीत आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**म्हाडा भवन इमारतीच्या दुरुस्ती कामावर ३६ कोटी रुपये खर्च करुनही इमारतीमध्ये गळती सुरुच असल्याबाबत**

**(१४) ३३४०४ (११-०१-२०२२). श्री.अशोक पवार (शिरुर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१२-१३ मध्ये महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रिय विकास महामंडळाचे (म्हाडा) वांद्रे,मुंबई येथील म्हाडा भवन इमारती बांधकामाचे स्ट्रक्चरल ऑडीट करण्यात येऊन त्या अहवालानुसार सन २०१० मध्ये दुरुस्तीच्या कामासाठी १० कोटी रुपये रक्कमेची प्रशासकीय मान्यता देण्यांत आली असल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दुरुस्तीचे काम सन २०१६ मध्ये पूर्ण होऊन त्या कामाचे म्हाडा प्रशासनाने कंत्राटदारांस ७ कोटी ६५ लक्ष रुपये अदा केले असल्याचे तसेंच सदर दुरुस्तीचे काम समाधानकारक असल्याचा अहवाल आयआयटीने दिला असल्याचेही निदर्शनास आले आहे हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, असें असतांना, पुन्हा दि.१६ सप्टेंबर, २०१९ रोजी वा त्यादरम्यान म्हाडा भवनाच्या इमारतीच्या दुरुस्तीसाठी ३६ कोटी रुपयांची सुधारीत प्रशासकीय मान्यता (सुप्रमा) देण्यांत आल्यावर येऊन दि.२४ जाने.२०१९ रोजी ई-निविदाच्या माध्यमातून कामाला मंजुरी देण्यांत येऊन संबंधित कंत्राटदारास २१ कोटी ७९ लाख रुपये इतकी रक्कम अदा करण्यांत आली असल्याचे व त्यानंतरही म्हाडा भवन इमारतीत पावसाची गळती सुरु असल्याचे दि.२८ जून, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, असें असतांना मागील दोन्ही वेळी केलेल्या इमारत दुरुस्ती कामाचे आयआयटीकडून स्ट्रक्चरल ऑडीट करण्यांत येऊन आयआयटीने दुरुस्तीचे काम समाधानकारक असल्याचे अहवाल देऊनही पावसाळयात इमारतीमध्ये गळती होण्यामागील कारणांची चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, त्याप्रकरणी चौकशी करण्यांत आली आहे काय, असल्यास, कोणामार्फत तसेंच त्यानुसार याबाबत पुढे कोणती कार्यवाही करण्यांत आली वा करण्यांत येत आहे

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय?

**डॉ. जितेंद्र आव्हाड (२८-०२-२०२२) :** (१) व (२) हे खरे आहे. म्हाडा भवन इमारतीच्या संरचनात्मक दुरूस्तीकरिता (Structural Repair Work) सन २०१४ मध्ये रू. १०.८६ कोटी रकमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली. तसेच रू. ७.६५ कोटी रकमेची निविदा काढून कामे सन २०१८ मध्ये (प्रथम टप्पा) पूर्ण करण्यात आली. (सदरहू कामात इमारतीचा अंशतः भाग समाविष्ट होता.

(३) (४) (५) व (६) संपूर्ण म्हाडा भवन इमारतीची संरचनात्मक दुरूस्तीची कामे एकाचवेळी पूर्ण करता येणे शक्य नसल्याने, संरचनात्मक दुरूस्तीकरिता दि.१६.११.२०१७ रोजी रू.३६.१७ कोटी रकमेची सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यात आली. दि.२४.०१.२०१९ रोजी रू. १४.०७ कोटी रकमेची निविदा काढून दुरूस्तीची कामे करण्यात आली. इमारतीच्या संरचनात्मक दुरूस्तीवर आतापर्यंत एकूण रू. २६.०५ कोटी खर्च झाला आहे.

दि. २८ जून २०२१ रोजी म्हाडा भवन इमारतीत पावसामुळे झालेली गळती संरचनात्मक (स्ट्रक्चरल) दुरूस्ती केलेल्या कामाच्या भागातून झालेली नसून इमारतीच्या छतावरील सिमेंट पत्र्यातून झाली आहे.

---

**डाकिवली-केळठण (जि.ठाणे) या रस्त्यांच्या दुरुस्तीकरीता ग्रामस्थांनी बेमुदत उपोषण सुरु केल्याबाबत**

**(१५) ३३७५६ (११-०१-२०२२). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयातील डाकिवली-केळठण या रस्त्यांच्या दुरुस्तीकरिता डाकिवली, चांबळे, लोहोपे व केळठण परिसरातील ग्रामस्थांनी दि.२७ ऑक्टोबर, २०२१ रोजीपासून बेमुदत उपोषण सुरु केले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्यांची दुरुस्ती तातडीने करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२४-०२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

सदरचे उपोषण एक दिवसात मागे घेण्यात आले आहे.

(२) सदरहू रस्त्याचे नवीन बांधकाम व नुतनीकरण करण्यासाठी मार्च २०२०-२१ च्या अर्थसंकल्पात डाकीवली केळठण भागातील कि.मी ३३/०० ते ३५/०० या लांबीतील बांधकामाकरीता रु.७००.०० लक्ष व गातेस खानिवली या भागातील कि.मी. ०/४०० ते १/४०० व ३/०० ते ३/५०० या लांबीतील बांधकामाकरीता रु.५००.०० लक्ष रकमेस मंजूरी प्राप्त झाली आहे.

तसेच याच रस्त्यावर पुरहानी कार्यक्रमाअर्तगत रु. ४४५.०० लक्ष रकमेस मंजूरी प्राप्त झाली आहे. सदरची कामे निविदा स्तरावर असून निविदा प्रक्रिया पूर्ण करुन कामे हाती घेऊन पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वरोरा, भद्रावती (जि. चंद्रपूर) तालुक्यांमधील शेतकऱ्यांच्या सोयबिन पिकांच्या नुकसानाबाबत**

**(१६) ३३८०५ (०७-०१-२०२२). श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरोरा, भद्रावती (जि. चंद्रपूर) तालुक्यांमधील शेतकऱ्यांचा मुख्य व्यवसाय शेती असुन प्रामुख्याने सोयाबिनचे पिक मोठया प्रमाणात घेतले जात असुन सध्याच्या हंगामात सोयबीन पिकांवर उंट, लष्करी अळीसह अन्य किडयांचा प्रादूर्भाव झाल्यामुळे पिके नष्ट होण्याच्या मार्गावर असल्याने शेतकऱ्यांना अनेक अडचणीना सामोरे जावे लागत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोनामुळे शेतकऱ्यांना आर्थिक समस्या असल्यामुळे शेतीपयोगी साहित्य खरेदीसाठी कसरत करावी लागत असुन जनावरांना लंपी स्कीन आजाराची लागण झाल्यामुळे त्यांच्या उपचारासाठी शेतकऱ्यांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर परिस्थितीचा विचार करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दादाजी भुसे (०४-०३-२०२२) :** (१) अंशत: खरे आहे.

चंद्रपूर जिल्हयातील वरोरा व भद्रावती तालुक्यांमध्ये मोठ्या प्रमाणात सोयाबीन पिक घेतले जाते. वरोरा तालुक्यात २७,१२४ हे. तर भद्रावती तालुक्यात ११,७४३ हे. असे एकूण ३८,८६७ हे. क्षेत्रावर सोयाबीन पिकाची पेरणी झालेली आहे. माहे ऑक्टोंबर अखेर पिकाची १०० टक्के कापणी पूर्ण झालेली आहे. माहे सप्टेंबर महिन्यात सोयाबीन पिकावर उंट अळी, लष्करी अळी, खोडमाशी व चक्री भुंगा यांचा प्रादुर्भाव अल्पशा प्रमाणात दिसून आला. सदर अळीचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीचे आत दिसून आला असून पिकाचे उत्पादनावर फरक दिसून आलेला नाही. सन २०२०-२१ च्या पिक कापणी प्रयोग सांखिकी अहवालानुसार सोयाबीन पिकाचे वरोरा तालुक्यात ५.५० क्विंटल प्रति हे. व भद्रावती तालुक्यात ६.८३ क्विंटल/प्रति हे. उत्पादकता प्राप्त झाली. त्या तुलनेत खरीप २०२१-२२ चे पिक कापणी प्रयोग सांखिकी अहवालानुसार सोयाबीन पिकाचे वरोरा तालुक्यात १५.३० क्विंटल प्रति हे. व भद्रावती तालुक्यात १६.६८ क्विंटल प्रति हे. उत्पादकता आली आहे. त्यामुळे किडीमुळे सोयाबीन पिकाचे उत्पादनावर फारसा परिणाम झाल्याचे दिसून येत नाही.

(२) हे खरे नाही.

माहे ऑक्टोबर २०२१ अथवा २०२१-२२ या वर्षात वरोरा, भद्रावती (जि.चंद्रपूर) व चंद्रपूर जिल्ह्यात लंपी स्कीन रोगाचा प्रादुर्भाव दिसून आलेला नाही. वरोरा तालुक्यातील १८ व भद्रावती तालुक्यातील १० पशुवैद्यकीय संस्थामार्फत शेतकऱ्यांच्या आजारी जनावरांना नियमितपणे उपचार केले जातात.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**(जि.चंद्रपूर) प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत सुरु असलेल्या घरकुलांचे काम निधीअभावी प्रलंबित असल्याबाबत**

**(१७) ३३८३५ (११-०१-२०२२). श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयात सुरु असलेल्या प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत सुरु असलेल्या घरकुलांचे काम निधी अभावी अपुर्णावस्थेत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पीएम योजनेंतर्गत घरकुलांचे काम अपूर्ण असल्यामुळे लाभार्थी उघडया जागेवर संसार करीत असल्याचे आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने पीएम आवास योजनेचा निधी त्वरीत वितरीत करुन घरकुल लाभार्थ्यांना त्यांची घरे त्वरीत मिळण्याबाबत शासनस्तरावरुन काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. जितेंद्र आव्हाड (०३-०३-२०२२) :** (१), (२) व (३) प्रधानमंत्री आवास योजना ( शहरी ) योजनेखाली घटक क्र. ४ अंतर्गत चंद्रपूर जिल्ह्यातील एकूण २५ प्रकल्पांना केंद्रीय मान्यता व सनियंत्रण समितीची मंजूरी प्राप्त आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील BLC घटकांतर्गत २५ प्रकल्पां मध्ये एकूण ६०२५ लाभार्थ्यांना राज्य शासनाच्या हिश्श्यापोटी एकूण रुपये ३१.१२२ कोटी व केंद्र शासनाच्या हिश्श्यापोटी एकूण रुपये १४.४६६ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत केंद्र शासनाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार केंद्र हिश्श्याचा निधी ४०%, ४० % आणी २० % अशा ३ टप्प्यात वितरीत करण्याची तरतूद आहे. तसेच, पुढील टप्प्यांचे निधी वितरीत कर ण्या साठी पुर्वी वितरीत करण्यात आलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे अंमल बजावणी यंत्राणांची निधीबाबत मागणी ही आवश्यक आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील शहराकरीता मंजूर घरकूलांसाठी अंमल बजावणी यंत्रणेच्या मागणी प्रमाणे केंद्र व राज्य शासनाचा निधी वितरीत व प्रस्तावित केले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**(ता.महाड, तळिये, जि.रायगड) येथील दरडग्रस्तांना घरे मिळणेबाबत**

**(१८) ३३९९१ (११-०१-२०२२). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील तळीयेसह आसपासच्या भागात अतिवृष्टीमुळे दरडी कोसळून झालेल्या दुर्घटनेत उध्वस्त झालेल्या २६१ घरांची उभारणी करण्याची जबाबदारी म्हाडावर सोपविण्यात आली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाड तालुक्यातील (जि.रायगड) तळिये दरडग्रस्तांना विशेषबाब म्हणून ६०० चौ.फूटांची घरे देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, कोंकणात वारंवार येणारी वादळे, पूर, अतिवृष्टी अशा संकटात मालमत्तेचे नुकसान होऊ नये यासाठी प्रि-फॅब्रिकेशन या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन घरे तयार करण्यात येणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. जितेंद्र आव्हाड (२८-०२-२०२२) :** (१), (२), व (३) हे खरे आहे.

मौ. तळीये, ता. महाड, जि. रायगड गावातील ८ वाडीतील २६३ कुटुंबाच्या पुनर्वसनासाठी Prefab Steel Structure with Precast Sandwich Panel Wall System या पध्दतीचे ३००० चौ. फुट जागेवर ६०० चौ. फुट चटई क्षेत्रफळाचे घरकुल म्हाडाच्या निधीतून बांधण्याकरीता दि.२३/१२/२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे.
(४), प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### औराद शहाजानी (ता.निलंगा, जिल्हा लातूर) येथील पुलाचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(१९) ३४०२३ (११-०१-२०२२). श्री.संभाजी पाटील-निलंगेकर (निलंगा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) निलंगा विधानसभा मतदार संघअंतर्गत असलेले मोठया बाजार पेठेचे औराद शहाजानी येथील उच्चस्तरीय पुलाच्या कामास मंजूरी मिळालेली असुन त्यांचा निधी उपलब्ध झाला आहे. मात्र केवळ भुसंपादन केले नसल्याने सदर काम सात वर्षापासून रखडले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, औराद शहाजानी ही केवळ निलंगा तालुक्यातच नव्हेच तर जिल्हाभरात नावाजलेली बाजार पेठ आहे. त्यामुळे या गावांशी जिल्हयासह परजिल्हा व परराज्यातील व्यापा-यांचा मोठा संपर्क आहे. मात्र पुलाचे काम रखडले असल्यामुळे नागरिकांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, या पुलासाठी केवळ दोन हजार एकशे बावन चौरस मिटरचे भुसंपादन आवश्यक आहे.मात्र हे भुसंपादन करण्यात आलेले नाही हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर काम तात्काळ होण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय?

**श्री. अशोकराव चव्हाण (०२-०३-२०२२) :** (१), (२), (३) व (४) होय, हे खरे आहे.
याप्रकरणी भूसंपादनाची प्रक्रीया प्रगती पथावर असून भूसंपादन पूर्ण होताच तात्काळ उर्वरीत काम हाती घेऊन सदर मार्ग वाहतूकीसाठी खुला करण्याचा योजिलेला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ठाणे जिल्हयातील सहायक वनसंरक्षक यांनी केलेल्या गैरव्यवहारा बाबत**

**(२०) ३४०३० (११-०१-२०२२). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयातील सहायक वनसंरक्षक बळीराम कोळेकर यांना वन विभागाच्याच दुस-या अधिका-यांकडे सुमारे ५ लाख ३० हजार रुपयांची घेतांना लाचलुचपत प्रतिबंधक अधिका-यांनी माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये अटक केली हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीनुसार संबधिताविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय?

**श्री. उद्धव ठाकरे (०२-०३-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) सदर प्रकरणी श्री. कोळेकर, सहायक वनसंरक्षक यांना शासन आदेश दि.१८/११/२०२१ अन्वये निलंबित करण्यात आले असून, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) १९७९ नियम ८ अंतर्गत चौकशी करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती जिल्हयातील बांधकाम विभागात कंत्राटदारांची देयके प्रलंबित असल्याबाबत**

**(२१) ३४०६६ (११-०१-२०२२). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयातील बांधकाम विभागात रस्ता दुरुस्ती व इतर कामे आल्यानंतर ही गेल्या दोन वर्षापासून कंत्राटदारांची अंदाजे ५० कोटींची देयके थकित असल्याचे दिनांक ३ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेऊन व निधीची तरतुद करुन येथील कंत्राटदारांची थकीत देयके अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अशोकराव चव्हाण (२३-०२-२०२२) :** (१) होय.
(२) व (३) अमरावती जिल्हयातील रस्ते दुरुस्ती व इतर कामांकरीता सन २०२१-२२ च्या आर्थिक वर्षात माहे डिसेंबर, २०२१ अखेर पर्यंत रू.५८७१.२४ लक्ष इतका निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

---

**पालघर जिल्ह्यातील पालघर-वाडा-देवगाव राज्यमार्ग वाहतुकीस बंद असल्याबाबत**

**(२२) ३४११३ (११-०१-२०२२). श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील महत्त्वाचा असणारा पालघर-वाडा-देवगाव हा राज्यमार्गावरील रस्ता आमले घाटात खचल्याने वाहतुकीस बंद असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ च्या सुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रस्त्याची शासनाने पाहणी केली आहे काय;

(३) असल्यास, सदरहू रस्ता तातडीने दुरुस्त करण्यासंदर्भात शासनाने काय उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२४-०२-२०२२) :** (१) होय, खरे आहे.

(२) सदर रस्त्याची पाहणी सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात आली आहे

(३) अतिवृष्टीमुळे सदर रस्त्यावरील खचलेल्या भागात ना दुरुस्त झालेले स्लॅब ड्रेन काढून त्या ठिकाणी आवश्यकते नुसार दोन पाईपच्या ड्रेनचे काम तातडीने पूर्ण करुन रस्त्यावरील वाहतूक पूर्ववत करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सन २०२०-२१ मध्ये हायब्रीड ॲन्यूटी या लेखाशिर्षाखाली वितरीत करण्यात आलेल्या निधीमधून उस्मानाबाद जिल्हयांला वगळल्याबाबत**

**(२३) ३४१२५ (११-०१-२०२२). डॉ.तानाजी सावंत (परांडा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिनस्त असलेल्या रस्त्यांचे देखभाल व दुरुस्तीसाठी सन २०२०-२१ मध्ये दिनांक ३ मे, २०२१ रोजी हायब्रीड ॲन्यूटी या लेखाशिर्षखाली रु.५५२.९२ कोटी वितरीत करण्यात आलेला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निधी वितरीत करतांना उस्मानाबाद जिल्हा वगळण्यांत आलेला आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उस्मानाबाद जिल्हयाकरीता रस्त्यांची दुरुस्ती व देखभालीकरीता काही विशिष्ठ निधीची तरतुद करण्यांत आलेली आहे काय किंवा करण्यांचे निश्चीत केलेले आहे,

(४) नसल्यास, उक्त बाब क्र.१, २ व ३ बाबत अद्यापही कांहीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अशोकराव चव्हाण (२३-०२-२०२२) :** (१) होय हे अंशत: खरे आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत हायब्रीड ॲन्युईटी कार्यक्रमांतर्गत सन २०२१-२२ या वर्षात अर्थसंकल्पीत तरतूदीतून दि. ३ मे, २०२१ रोजी एकूण रू.५८७.६९ कोटी इतका निधी प्रगतीपथावर असलेल्या विविध प्रकल्प/पॅकेजेसकरीता वितरीत करण्यात आलेला आहे.

(२) हायब्रीड ॲन्युईटी योजनेअंतर्गत सुरु असलेल्या प्रकल्प/पॅकेज यांना शासननिर्णय दि.१.११.२०१८ अन्वये विहीत केलेल्या कार्यपध्दतीनुसार उपलब्ध निधीच्या मर्यादेत अनुदान वितरीत करण्यात येते.

(३) व (४) उस्मानाबाद जिल्हयाकरीता रस्त्यांच्या परिरक्षण व दुरुस्तीकरीता सन २०२१-२२ या वर्षासाठी रु.६६.२८ कोटी इतकी तरतूद अर्थसंकल्पीत करण्यात आली आहे.

---

## शहीद जवानांसाठी बांधलेल्या इमारतींची दुरुस्ती करणेबाबत

**(२४) ३४४६० (११-०१-२०२२). श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.अशोक पवार (शिरुर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन १९६३, १९६५ व इतर युध्दामध्ये शहीद झालेल्या जवानांच्या कुटुंबियांसाठी मुंबईतील दानशूर व्यापाऱ्यांनी वानवडी (पुणे) येथे बांधलेल्या इमारतीमध्ये शहीद जवानांची २४ कुटुंबिये गेल्या अनेक म्हणजे जवळपास ५२ वर्षापासून राहत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दोन्ही इमारती अत्यंत जुन्या झाल्यामुळे इमारतीची दुरावस्था होऊन तेथील संरक्षक भित कोसळल्यामुळे इमारतीत पाणी शिरणे व भिंतीमध्ये पाणी झिरपून इमारती कोसळण्याचे स्थितीत असल्याने व दुरुस्तीसाठी जिल्हा सैनिक बोर्डाची आर्थिक स्थिती कमकुवत असल्यामुळे शहीद कुटुंबिय रहिवाश्यांनी तसेच पुणे जिल्हा सैनिक बोर्डाने शासनाकडे केली असल्याचे दि. १२ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, शहीद कुटुंबे व पुणे जिल्हा सैनिक बोर्डाने शासनाकडे केलेल्या मागणीनुसार सदर इमारती दुरुस्ती संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली अथवा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. उद्धव ठाकरे (०३-०३-२०२२) :** (१) होय

(२) मागील काही वर्षात झालेल्या अतिवृष्टीमुळे इमारतीचे आणि सुरक्षा भिंतीचे नुकसान झाले आहे. सदर इमारत शासकीय नाही. सदर इमारतीच्या देखभाल दुरुस्तीची जबाबदारी इमारतीमधील रहिवाशांची आहे. तरीदेखील सदर इमारतीच्या दुरुस्तीबाबत सैनिक कल्याण विभाग, पुणे यांनी दि. १३ जुलै, २०२१ रोजी शासनाकडे प्रस्ताव पाठविला आहे.

(३) जिल्हा सैनिक कल्याण विभागाच्या प्रस्तावानुसार सदर इमारतीची देखभाल व दुरुस्ती सार्वजनीक बांधकाम विभागाने करावी असा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाला पाठविण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वसमत व कळमनुरी (जि.हिंगोली) येथील अनेक गावांमध्ये भूकंपाचे सौम्य धक्के बसत असल्याबाबत**

**(२५) ३४४९० (११-०१-२०२२). श्री.चंद्रकांत ऊर्फ राजुभैय्या रमाकांत नवघरे (बसमत) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसमत (जि.हिंगोली) तालुक्यातील चोंडी, पार्डी बुा. पारडी खुर्द, कोठारी, पांगरा शिंदे, डोनवाडा, सुकळी, राजवाडी, खांबाळा, आंबा, शिरली, खापरखेडा, वापटी, मरसुला सेलू, गिरगाव, भेंडेगाव व पांगरा बोखारे तसेच औंढा (जि.हिंगोली) कंर्जाळा, अनखळी, पिंपळदरी, सोनवाडी, राजदरी, आमदारी, जामगव्हाण, देवाळे, कुडकट, पिंपरी त्याचप्रमाणे कळमनुरी (जि.हिंगोली) पोगा, सिंदगी, जामा, बोल्डा, मेटलगाव, सुकळी विर, पावणभारी बोधी, तोंडापूर, मोशी, येडश्खी आदि गावांमध्ये दि. ३१ जानेवारी, २०२१ व १० सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास भूकंपाचे धक्के जाणवले असून परिसरातील नागरिकांमधे असुरक्षिततेचे व घबराटीचे वातावरण निर्माण झाले असल्याचे वेळोवेळी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गेल्या अनेक वर्षापासून वसमत मतदार संघातील अनेक गावांमध्ये सौम्य भूकंपाचे धक्के बसत असून जमिनीतून गुढ आवाज येत आहेत, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, या तालुक्यात कोणत्या प्रकारची जिवीत व वित्तहानी होऊ नये व सुरक्षिततेच्या दृष्टीने सर्व बाबींचे परिक्षण होणे गरजेचे असल्याने भूकंपाचे परिक्षण् करण्यासाठीचे पथक पाठविण्याबाबतची विनंती संबंधित लोकप्रतिनिधीनी मा.मदत व पुर्नवसन मंत्री /राज्यमंत्री यांचेकडे दि. ०६ फेब्रुवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास पत्राद्वारे निवेदन देण्यात आले होते, हेही खरे आहे काय,

(४) तसेच वसमत तालुक्यातील पांगरा शिंदे हे गांव भुकंपाचे केंद्र बनल्यामुळे या भुकंपाची कारणे शोधण्यांत येऊन त्याबाबत संशोधन होण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठपुरावा करावा, अशी हिंगोली जिल्हावासियांनी राज्यशासनाकडे आग्रही मागणी केली असल्योही निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त तालुक्यातील भुकंपाचे परिक्षण व संशोधन होण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. उद्धव ठाकरे (०२-०३-२०२२) :** (१) होय, खरे आहे.

(२) होय, खरे आहे.

(३) होय, खरे आहे.

याबाबत परिक्षण करणेबाबत (i) उप महासंचालक भारतीय हवामान खाते, मुंबई (ii) संचालक, भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षण, पुणे (iii) संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे यांना कळविले आहे.

(४) व (५) जिल्हाधिकारी, हिंगोली यांच्या पत्रास अनुसरुन दि.१३.०९.२०२१ च्या शासन पत्रान्वये भारत मौसम विज्ञान विभाग यांच्याशी त्वरीत संपर्क साधून परिसराची तपासणी करुन घेण्याबाबत जिल्हाधिकारी, हिंगोली यांना कळविण्यात आलेले आहे.

याशिवाय सन २०१७ मध्ये मौजे पांगरा शिंदे, ता. वसमत, जि. हिंगोली या गावाचे भूजल सर्वेक्षण विभाग, हिंगोली व स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्या School Of Earth Sciences विभागामार्फत परिक्षण व संशोधन करण्यात आलेले आहे.

तसेच जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत वेळोवेळी नागरिकांसाठी भुकंप आपत्तीच्या अनुषंगाने काय करावे आणि काय करु नये याबाबत जनजागृती कार्यक्रम अंतर्गत चित्ररथ, पथनाट्य घेण्यात आले आहेत. तसेच संबंधित अधिकारी, कर्मचारी आणि नागरिकांसाठी प्रशिक्षण / कार्यशाळा वेळोवेळी आयोजित करण्यात आल्या आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**केंद्र शासनाकडे सादर केलेल्या राज्यातील सागरी महामार्गाच्या प्रारूप आराखडयाच्या मंजुरीबाबत**

**(२६) ३५०३७ (१७-०१-२०२२). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी, रायगड व सिंधुदुर्ग जिल्हयातून जाणा-या सुमारे ५७० कि.मी. लांबीच्या सागरी महामार्गाचे पेव्हड शोल्डरसह उन्नतीकरण करण्याच्या कामाकरिता प्रत्यक्ष तसेच ड्रोन कॅमेराद्वारे सर्वेक्षण करण्यात येवून या कामाचा प्रारूप आराखडा मार्च, २०१८ मध्ये केंद्र शासनाकडे मंजुरीसाठी सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रारूप आराखडयाला केंद्र शासनाकडून मंजुरी मिळाली आहे काय, मंजुरी मिळाली असल्यास या कामाची सदयस्थिती काय आहे,

(३) प्रारूप आराखडयाला अदयाप मंजुरी मिळाली नसल्यास राज्य शासन त्यासाठी कोणते प्रयत्न करीत आहे वा करणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय?

**श्री. अशोकराव चव्हाण (०३-०३-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रारुप आराखडयास अद्याप केंद्र शासनाकडून मंजूरी प्राप्त झालेली नाही.

(३) केंद्र शासनाकडे मंजूरीसाठी पाठपुरावा करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राजापूर तालुका (जि.रत्नागिरी) कृषि अधिकारी पदासह या कार्यालयातील तब्बल १७ पदे रिक्त असल्याबाबत**

**(२७) ३५१२८ (०५-०१-२०२२). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजापूर (जि.रत्नागिरी) येथील तालुका कृषि अधिकारी पदासह या कार्यालयातील तब्बल १७ पदे रिक्त असल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असुन पदे रिक्त असल्याने विभागाचा कारभार प्रभारी यांच्या मार्फत चालविण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विभागातील कृषि सहाय्यकांची निम्म्याहून अधिक पदे कांही वर्षापासून रिक्त असुन सदर पदे रिक्त राहण्यामागची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन उक्त पदे तात्काळ भरण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (०४-०३-२०२२) :** (१) हे खरे आहे.
राजापूर जि.रत्नागिरी तालुका कृषि अधिकारी कार्यालयाच्या अधिनस्त कृषि विभागाची गट-अ ते गट-ड संवर्गाकरिता एकूण ६७ पदे मंजूर असून सद्यस्थितीत त्यापैकी ३५ पदे भरलेली व ३२ पदे रिक्त आहेत.
वरील पदांमध्ये तांत्रिक संवर्गाची (कृषि सेवेतील) ४९ पदे मंजूर असून त्यापैकी ३१ पदे भरलेली तर तालुका कृषि अधिकारी पदासह एकूण १८ पदे रिक्त आहेत. तांत्रिक संवर्गातील रिक्त पदांचे प्रमाण सुमारे ३७ टक्के आहे.
तालुका कृषि अधिकारी, राजापूर जि.रत्नागिरी पदाचा अतिरिक्त कार्यभार सदर कार्यालयातील कृषि अधिकारी यांचेकडे सोपविण्यात आलेला आहे.
(२) हे खरे नाही.
राजापूर जि.रत्नागिरी तालुक्यात कृषि सहाय्यकांची ३७ पदे मंजूर असून त्यापैकी २२ पदे भरलेली तर १५ पदे रिक्त आहेत. सध्या कोविड-१९ मुळे पदभरतीवर निर्बंध असल्याने तसेच दरम्यानच्या कालावधीत पदोन्नती, बदली, राजीनामा व आंतरसंभागीय बदली या कारणांमुळे कृषि सहाय्यक संवर्गाची काही पदे रिक्त असून रिक्त असणाऱ्या पदांचा अतिरिक्त कार्यभार नजीकच्या अधिकारी/कर्मचारी यांचेकडे देवून कृषि विभागाच्या योजनांची अंमलबजावणी करण्यात येत आहे.
(३) महाराष्ट्र कृषि सेवा गट-ब (कनिष्ठ) पदाकरिता महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत शिफारस करण्यात आलेल्या २ अधिकाऱ्यांना सरळसेवेने फेब्रुवारी, २०२० मध्ये आणि दि.१८.०१.२०२२ च्या आदेशान्वये या संवर्गात पदोन्नतीने एका अधिकाऱ्यास राजापूर तालुक्यात पदस्थापना दिलेली आहे.
कृषि सेवा परीक्षा-२०२१ करिता महाराष्ट्र कृषि सेवा संवर्गातील एकूण २०३ पदांचे मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगास पाठविण्यात आले असून सदर पदांकरिता उमेदवारांची शिफारस प्राप्त झाल्यास राजापूर तालुक्यातील रिक्त पदे प्राथम्यक्रमाने भरण्यात येतील.
महाराष्ट्र कृषि सेवा गट-ब (तालुका कृषि अधिकारी) संवर्गातील पदोन्नती कोट्यातील रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही विभागामार्फत सुरू आहे. तांत्रिक संवर्गातील पदे मुख्यत: भरण्यात आलेली आहेत. तसेच सद्यस्थितीत वित्त विभागाच्या दि.४ मे, २०२० रोजीच्या शासन निर्णयानुसार नवीन पदभरतीवर निर्बंध असल्याने तुर्तास गट-क आणि ड मधील कोणतीही नवीन पदभरती करता येणे शक्य नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

**कोरची (जि. गडचिरोली) येथील बेडगाव वन परिक्षेत्रात**
**बांबुची तस्करी केल्याबाबत**

**(२८) ३५१६५ (१७-०१-२०२२).श्री.कृष्णा गजबे (आरमोरी)** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरची, जि. गडचिरोली येथील बेडगाव वन परिक्षेत्रा अंतर्गत झनकार गोंदी ग्रामसभेला अनुसुचित जमाती व इतर पारंपारीक वन निवासी अधिनियम २००६ व २००८ नुसार वनौपजाची विक्री व विल्हेवाट लावण्याचा अधिकार प्राप्त झालेला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, झनकार गोंदी व टेमली हद्दीतील कक्ष क्र. ४५१,४५८ व ४५९ मधील अंदाजे २ कोटी ४० लक्ष रुपये किमतीचे १७ लक्ष बांबु कंत्राटदार व संबंधीत अधिकाऱ्याने ग्रामसभेला विश्वासात न घेता परस्पर विकल्याची गंभीर बाब माहे आक्टोंबर, २०२१ च्या पहील्या आठवडयात निदर्शनास आलेली आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधीत कंत्राटदार व अधिकारी यांची चौकशी करुन शासनाचा बुडालेला महसुल वसुल करण्याची व संबंधीतांविरुद्ध नियमानुसार कार्यवाही करण्यात आलेली आहे वा करण्यात येत आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय?

**श्री. उद्धव ठाकरे (२५-०२-२०२२) :** (१) अनुसूचित क्षेत्रामध्ये येणाऱ्या झनकारगोदी ग्रामसभेस अनुसूचित जमाती व इतर पारंपारीक वननिवासी, वनहक्क मान्य करणे नियम २००८ नुसार जिल्हा प्रकरण क्र.४४६/२०११ प्रमाणे सामुहिक वनहक्काचे हक्क, जोडपत्र-३ (सुधारीत) अन्वये कक्ष क्र.४८३, ४८४, ४८५, १३२१, १३२२ व सर्वे क्र.१९, ५२, १६, ४९, २०, १४ व १८ असे एकूण ६३८.२५ हे. क्षेत्र वनहक्का अंतर्गत मिळालेले आहे.

(२) व (३) कक्ष क्र.४५१, ४५८ व ४५९ झनकार गोंदी ग्रामसेभेच्या हद्दीत येत नसून, गडेली ग्रामसभेच्या हद्दीत येत आहे. त्यानुसार गडेली ग्रामसभेने कक्ष क्र.४५१, ४५८ व ४५९ मध्ये पेसा पर्याय-२ ची (ग्राम विकास विभाग शासन निर्णय क्र.पेसा-२०१२/प्र.क्र.६५/पंरा-२, दिनांक ३१.०३.२०१५ अन्वये ग्रामसभा स्वत: आवश्यकेनुसार संबंधित विभागाचे तांत्रिक सहाय्य घेऊन वनविभागाची कार्यपध्दती अनुसरुन बांबूची कापणी, विक्री करु शकतात) निवड केली आणि अटी व शर्तीनुसार गडेली ग्रामसभेने कंत्राटदारासोबत करारनामा केला आहे. त्यानुसार गडेली ग्रामसभेने कक्ष क्र.४५१, ४५८ व ४५९ या तीनही कक्षातील ३७७८४ लांब बांबु बंडल्स व १०६०० हॉफ बांबु बंडल्सचे कंत्राटदारामार्फत निष्कासन केले आहे. सदर निष्कासीत बांबू संबंधित विभागाचे तांत्रिक सहाय्य घेऊन, वनविभागाची कार्यपध्दती अनुसरुन आणि अंदाजपत्रकिय तरतुदीच्या अधिन राहून बांबूची कापणी केली आहे. तोडलेला बांबू हा गडेली ग्रामसभेने पेसा कायदा पर्याय-२ अंतर्गत स्वत:हून विक्री केलेला आहे. सदर विक्री प्रक्रियेमध्ये वन विभागाचा कोणताही संबंध नाही. त्यामुळे सदर प्रकरणी कोणतीही अनियमितता किंवा गैरव्यवहार झालेला नसल्याने संबंधित अधिकारी यांचेवर कार्यवाहीचा प्रश्नच उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बीड येथील विभागीय वन अधिकारी, यांनी शासनाच्या निधीचा केलेल्या दुरपयोगाबाबत**

**(२९) ३५१७४ (१७-०१-२०२२). श्री.संदिप क्षिरसागर (बीड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्ह्यातील बीड व शिरुर कासार तालुक्यातील राज्य योजना, जिल्हा वार्षिक योजना, मग्रारोहयो आदि योजनांअंतर्गत व इतर लेखाशिर्षातील कामे तसेच घनवृक्ष लागवड, रोपवाटीका, रोपनिर्मिती, वनतळ्याभोवती चॅनलिंग फेसीस कामे अशी विविध कामे वैयक्तिक पातळीवर व आपल्या मर्जीतील नातेवाईक व अन्य व्यक्तींकडून करुन घेऊन शासनाचा निधी लाटल्याबाबत संबंधित विभागीय वन अधिकारी (श्री. सातपुते) सामाजिक वनीकरण, बीड यांचेबाबत नागरिकांनी असंख्य तक्रारी केल्या असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त कामांचे रेकॉर्ड न ठेवता संबंधित अधिकाऱ्याने मूळ रेकॉर्डच नष्ट केल्याचेही निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित विभागिय वन अधिकारी (श्री. सातपुते) सामाजिक वनीकरण, बीड यांनी नियमबाह्य कामे करुन शासन निधीचा आर्थिक घोटाळा केल्याप्रकरणी खातेनिहाय चौकशी करुन त्यांचेविरुध्द कारवाई करण्यांत यावी, अशी मागणी मा. स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दि. ३ ऑक्टोबर, २०२१ रोजी मा. राज्यमंत्री, वने यांना पत्र-निवेदने देऊन करण्यांत आली आहे, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर मागणीसंदर्भात शासनाने कोणती कारवाई केली अथवा करण्यांत येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय?

**श्री. उद्धव ठाकरे (०२-०३-२०२२) :** (१) हे अंशतः खरे आहे.

जिल्ह्यातील बीड व शिरुर कासार तालुक्यातील राज्य योजना, जिल्हा वार्षिक योजना, मग्रारोहयो इ. योजनांतर्गत व इतर लेखाशिर्षातील कामे तसेच घनवृक्ष लागवड, रोपवाटीका, रोपनिर्मिती, वनतळयाभोवती चेनलिंक फॅसींग कामे अशी विविध कामे वैयक्तिक पातळीवर व आपल्या मर्जीतील नातेवाईक व अन्य व्यक्तीकडून करुन घेऊन शासनाचा निधी लाटल्याबाबत संबंधित विभागीय वन अधिकारी (श्री. सातपुते) सामाजिक वनीकरण, बीड यांची खातेनिहाय चौकशी होवून कार्यवाही प्रस्तावित होणेबाबत मा. श्री. संदिप रविंद्र क्षीरसागर, वि.स.स. यांच्या दि. १५.०९.२०२१ व दि. ३.१०.२०२१ रोजीच्या पत्रान्वये तक्रार प्राप्त झाली आहे. मात्र इतर नागरिकांमार्फत सदर प्रमाणे असंख्य तक्रारी केल्या आहेत हे सत्य नाही.

उक्त विविध योजनेंतर्गत मंजूर उद्दिष्टानुसार प्राप्त निधी हा शासन नियमानुसार व प्रचलीत मापदंडाप्रमाणे केलेल्या कामाप्रमाणेच संबंधित मजूर व कंत्राटदार यांना रोखीने अदा न करता संबंधितांच्या बँक खात्यामध्ये धनादेशाद्वारे संबंधित वनपरिक्षेत्र अधिकारी यांचेकडून अदा केला जातो. त्यामुळे शासनाचा कोणताही निधी लाटण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. चेनलिंक फॅसिंगची कामे ही ऑनलाईन ई-निविदा प्रणालीनुसार मंजूर निविदाधारकांकडून करण्यात आलेली असून त्यांना काम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र व मोजमाप पुस्तिकेतील नोंदीनुसार सदर कामांची देयके धनादेशाद्वारे विभागीय वन अधिकारी (सामाजिक वनीकरण), बीड यांचेद्वारे अदा करण्यात आलेली आहेत.

(२) हे खरे नाही.

सामाजिक वनीकरण विभाग, बीड अंतर्गत विविध योजनेमध्ये करण्यात आलेल्या कामांचे रेकॉर्ड नष्ट करण्याचा कुठलाही प्रकार निदर्शनास आलेला नाही.

(३) होय, हे खरे आहे.

(४) मा. श्री. संदिप रविंद्र क्षीरसागर, वि.स.स. यांचे दि. १५.०९.२०२१ व दि. ३.१०.२०२१ रोजी मा. राज्यमंत्री (वने) यांना सादर केलेल्या पत्रांच्या अनुषंगाने वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, औरंगाबाद यांनी अनुक्रमे दि. २७.०९.२०२१, दि. १६.१२.२०२१ व दि. २४.०१.२०२२ च्या पत्रांन्वये तक्रारीबाबत नियमानुसार पुढील कार्यवाही करणेकरिता, तक्रार अर्जात नमूद मुद्द्यांच्या अनुषंगाने निश्चित स्वरुपाच्या पुराव्याची कागदपत्रे उपलब्ध करुन देण्याबाबत मा. संदिप रविंद्र क्षीरसागर वि.स.स. यांना विनंती केलेली आहे. सदर प्रमाणे मागविलेली कागदपत्रे व तपशीलवार माहिती प्राप्त होताच तक्रारीबाबत नियमानुसार पुढील कार्यवाही करण्याची तजविज ठेवण्यात येत आहे.

(५) प्रश्नच उद्‌भवत नाही.

---

**हिंगोली जिल्हयातील उमरा फाटा ते आसेगांव नांदेड सिम्मा हद्दीपर्यंत व झिरोफाटा ते नागेशवाडी फाटा येथील रस्त्यांची झालेली दुरवस्था**

**(३०) ३५२०८ (१७-०१-२०२२). श्री.चंद्रकांत ऊर्फ राजुभैय्या रमाकांत नवघरे (बसमत) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्यातील वसमत विधानसभा मतदारसंघातील उमरा फाटा (कळमनुरी) ते वसमत तालुक्यातील आसेगांव नांदेड सिम्मा हद्दीपर्यंत व झिरोफाटा ते नागेशवाडी फाटा या सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत २ रस्त्यांच्या कामांची प्रगती व सद्यस्थिती काय आहे,

(२) या रस्त्यांची कामे संथगतीने सुरु असून ही कामे निकृष्ठ दर्जाची होत असल्याची बाब संबंधीत लोकप्रतिनिधींच्या निदर्शनास आली आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, निकृष्ठ दर्जाचे काम करणाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अशोकराव चव्हाण (२४-०२-२०२२) :** (१) हिंगोली जिल्हयातील वसमत तालुक्यातील उमरा फाटा (कळमनुरी) ते आसेगांव नांदेड हद्दीपर्यंतचा रस्ता हा हायब्रीड ॲन्युईटी पॅकेज क्र.११६ मध्ये अंतर्भूत असून, या रस्त्याचे ८१.१०% काम पूर्ण झाले आहे. झिरोफाटा ते नागेशवाडी फाटा हा रस्ता हायब्रीड ॲन्युईटी पॅकेज क्र.११५ मध्ये अंतर्भूत असून, या रस्त्याचे काम ८२.५०% पुर्ण झालेले आहे.

(२) व (३) हायब्रीड ॲन्युईटी पॅकेज क्र.११६ अंतर्गत कामे ही करारनाम्याच्या तरतूदीनुसार, निकष व संकल्पनानुसार कार्यान्वित करण्यात आली आहेत, व गुणवत्ता तपासून अंतिम करण्यात येत आहेत. ॲन्युईटी पॅकेज क्र.११६ बाबत कोणतीही तक्रार प्राप्त नाही.

हायब्रीड ॲन्युईटी पॅकेज क्र.११५ बाबत प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने गठीत करण्यात आलेल्या समितीस तक्रारीत कोणतेही तथ्य आढळून आलेले नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**क्रीडा प्रकारांचा शासकीय नोकऱ्यांमधील खेळाडू कोट्यासाठी समावेश करण्याबाबत**

**(३१) ३५४६३ (०७-०१-२०२२). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाच्या अखत्यारित येणाऱ्या वेगवेगळ्या विभागांमध्ये नोकरीसाठी खेळाडू कोटा अंतर्गत निवड झालेल्या उमेदवारांची गेल्या पाच वर्षातील एकूण संख्या किती आहे तसेच नोकऱ्यांमधील खेळाडू कोट्यासाठी केंद्र सरकारने नव्याने २१ क्रीडा प्रकारांचा समावेश केलेला आहे, त्या धर्तीवर शासन नवीन क्रीडा प्रकारांचा राज्य शासनाच्या नोकऱ्यांमधील खेळाडू कोट्याकरिता समावेश करण्यासाठी विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, खेळाडू कोट्यातील उमेदवारांना केवळ क्रीडा विभागात नोकऱ्या देण्यासंदर्भात शासन विचाराधीन असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुनिल केदार (०२-०३-२०२२) :** (१), (२) व (३) अत्युच्च गुणवत्ता धारण केलेल्या ३२ खेळाडूंना मागील ५ वर्षात वेगवेगळ्या विभागात थेट नियुक्ती देण्यात आली आहे. अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंना प्रथमतः क्रीडा विभागात थेट नियुक्तीचे धोरण ठरविण्याची बाब तपासण्यात येत आहे
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना सुरु करुन बाधितांना लाभ देण्याबाबत**

**(३२) ३५४८३ (०६-०१-२०२२). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना दिनांक ७ ते १० डिसेंबर, २०१९ या कालावधीत खंडित असल्यामुळे दावे मोठया प्रमाणात प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर दोन दिवसांतील खंडित कालावधीतील योजना सुरु करून बाधितांना लाभ देण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन उक्त मागणीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (०४-०३-२०२२) :** (१) अंशतः खरे आहे.

सन २०१८-१९ या वर्षात राबविण्यात आलेल्या योजनेचा कालावधी दि.८.१२.२०१८ ते दि.७.१२.२०१९ असा होता. सन २०१९-२० वर्षात राबविण्यात आलेली योजना दि.१०.१२.२०१९ पासून सुरु झाली. त्यामुळे दि.८.१२.२०१९ व दि.९.१२.२०१९ हे दोन दिवस योजनेचा खंडीत कालावधी आहे.

(२) हे खरे आहे.

(३) गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेअंतर्गत दि.८.१२.२०१९ ते दि.९.१२.२०१९ या दोन दिवसांच्या खंडीत कालावधीतील प्रस्तावांना लाभ देण्यासंदर्भातील बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### चेंबूर (मुंबई) येथे वाशीनाका परिसरात गुन्हेगारीचे प्रमाण वाढल्याबाबत

**(३३) ३५५१३ (१०-०१-२०२२). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चेंबूर (मुंबई) येथे वाशीनाका परिसरात रस्ते, नाले व इतर प्रकल्पात बाधित झालेल्या झोपडी धारकांसाठी म्हाडा व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) यांच्या माध्यमातून अनेक इमारती बांधल्या असून तेथे नागरीवस्त्यांमुळे गुन्हेगारीचे प्रमाण देखील वाढले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गुन्हेगारीवर आळा घालण्यासाठी दोन वर्षांपूर्वी तेथे बांधण्यात आलेल्या पोलिस चौकीवर अतिक्रमण होत असून पोलिसांची व्यवस्था करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्थानिक नागरिकांना होणारा मनःस्ताप रोखण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (०४-०३-२०२२) :** (१) वाशीनाका परिसरात म्हाडा व एम.एम.आर.डी तर्फे अनेक इमारती बांधून पूर्ण करण्यात आल्या आहेत. सदर इमारतीमध्ये मुंबईतील पुनर्वसन झालेले बरेच लोक राहण्यास आलेले आहेत. त्यामुळे लोकांची संख्या वाढल्यामुळे गुन्हयाचे प्रमाण वाढले आहे हे खरे आहे.

(२) सदर परिसरात श्री.तुकाराम काते, माजी विधानमंडळ सदस्य यांच्या आमदार निधीतून एम.एम.आर.डी.ए कॉलनी येथे एक मजली इमारत बांधली आहे. सदर इमारतीच्या तळमजल्यामधील एक खोली आर.सी.एफ पोलीस ठाणेच्या पोलीसांची गैरसोय होऊ नये, म्हणून आर.सी.एफ पोलीस ठाण्याला दिली आहे. सदर खोलीवर कोणत्याही प्रकारचे अतिक्रमण झालेले नाही.

(३) सदर ठिकाणी असलेल्या पोलीस चौकी मध्ये पोलीस अधिकारी व अंमलदार यांची कर्तव्याकरिता नेमणूक केली जाते, तसेच दिवसपाळी व रात्रपाळी करिता नेमलेले बीट मार्शलवरील पोलीस अधिकारी व अंमलदार हे त्याठिकाणी रहिवाशांच्या तक्रारी ऐकूण त्याप्रमाणे निवारण करतात. सदर परिसरात पोलीस बीट मार्शल व मोबाइल वाहने यांच्याद्‌वारे सतत गस्त ठेवुन गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे एकफळ (ता.शेगांव, जि.बुलढाणा) येथील रस्त्या भूसंपादना अभावी अपूर्णावस्थेत असल्यबाबत**

**(३४) ३५६७५ (१७-०१-२०२२). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे एकफळ (ता.शेगांव, जि.बुलढाणा) येथील मलकापूर पान्हेरा निमगांव नारखेड माटरगाव जलंब कुरखेड एकफळ आळसणा शेगांव नागझरी या प्रजिमा ७ ची लांबी ८०० मीटर लांबीचा रस्ता भूसंपादन अभावी पूर्ण होवू शकलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मौजे एकफळ या गावाला जाण्यसाठी सदरचा रस्ता हा एकमेव रस्ता असल्याने व सदरहू रस्त्याचे काम अद्याप पूर्ण न झाल्याने येथील नागरिकांना आपत्कालीन परिस्थितीत वैद्यकीय उपचारार्थ जीव धोक्यात घालून रेल्वे लाईन क्रॉसिंग करावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू रस्त्याकरिता आवश्यक असलेल्या जागेचे तातडीने भूसंपादन करण्याबाबत शासनाने आजवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, असल्यास त्याचा तपशील काय आहे,

(४) अद्याप भूसंपादनाची कार्यवाही केली नसल्यास, या प्रकरणी होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत व सदरहू प्रकरणी भूसंपादनाची प्रक्रिया तातडीने पूर्ण करून या रस्त्याचे काम किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार असून याबाबत शासनाची नेमकी भूमिका काय आहे,

**श्री. अशोकराव चव्हाण (०२-०३-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) ते (४) याप्रकरणी संबंधित शेतकऱ्यांनी जमिनीचे संमतीपत्र भूसंपादन अधिकारी, खामगाव यांच्याकडे उपलब्ध करुन दिली आहे. प्रश्नांकीत ८०० मी. लांबीचे रस्त्याकरिता आवश्यक जागेचे भूसंपादन व रस्त्याचे बांधकाम करणे करिता निधी उपलब्धतेनुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**धुळे शहरातील वाहतूक कोंडी व अपघात टाळण्यासाठी उड्डाण पूल बांधण्याबाबत**

**(३५) ३५७२३ (११-०१-२०२२). श्री.फारूक शाह (धुळे शहर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे शहरातील शिवाजी महाराज पुतळा, मनोहर टॉकीज, गांधी पुतळा रस्त्यावर सतत वाहतूक कोंडी होणे, अपघाताची व दुर्घटनांची वाढती संख्या लक्षात घेऊन हे टाळण्यासाठी या भागाला जोडणारा उड्डाण पूल निर्माण व्हावा अशी मागणी लोकप्रतिनिधींनी केली होती, हे खरे आहे का,

(२) असल्यास, प्रशासकीय व तांत्रिक अडचणी मुळे अद्यापही ही मागणी मंजूर झालेली नाही, हे देखील खरे आहे का,

(३) असल्यास, सततची वाहतूक कोंडी व अपघाताला निमंत्रण देणाऱ्या या रस्त्यावर शासन उड्डाण पूल बांधण्याची प्रक्रिया कधीपासून सुरु करणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय?

**श्री. अशोकराव चव्हाण (२१-०२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) (३) व (४) मागणीकृत ठिकाणी उड्डाणपुलाचे कामासाठी अस्तीत्वातील रस्त्याची रुंदी कमी असून दोन्ही बाजूस फार जुनी दुकाने असल्याने भूसंपादन शक्य नसून उड्डाणपुल बांधणे तांत्रिकदृष्ट्या सुसाध्य ठरत नाही.
वाहतूक कोंडीचा प्रश्न सोडविण्यासाठी पर्यायी विकल्पाचा अभ्यास करून, प्रश्नांकित काम हे निकष, मंजूरी व निधी उपलब्धततेच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन राहील.

---

### (ता.वसमत, जि.हिंगोली) ए.डी.बी. अंतर्गत समाविष्ट असलेले डी.पी.आर. स्तरावरील रस्त्यांचा समावेश अर्थसंकल्पात करण्याबाबत

**(३६) ३५८६७ (११-०१-२०२२). श्री.चंद्रकांत ऊर्फ राजुभैय्या रमाकांत नवघरे (बसमत), श्री.इंद्रनिल नाईक (पुसद), श्री.यशवंत माने (मोहोळ) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) (ता.वसमत, जि.हिंगोली) १) दगडगांव नहाद-जवळाबाजार रस्त्यावरील कि.मी. ०/०० ते २७/६०० ची सुधारणा करणे प्रजिमा १६, वसमत तालुक्यातील रामा २५५ वर ते एरंडेश्वर-रिधौरा-पळशी-लिंगी-पिंपळाचौरे-बांभुळगाव-आसेगांव रामा २५७ ला मिळणाऱ्या रस्त्याची सुधारणा करणे किमी ०/०० ते २५/० प्रजिमा. १५ या रस्त्यांच्या कामाचा ए.डी.बी. अंतर्गत समाविष्ट असलेले डी.पी.आर. स्तरावरील दोन अत्यंत महत्वाच्या रस्त्यांचा समावेश अर्थसंकल्पात करावा अशी विनंती दिनांक २० डिसेंबर, २०२० रोजी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास या कामांसाठी किती तरतूद करण्यात आली असून, रस्त्यांच्या कामांची प्रगती व सद्य:स्थिती काय आहे,
(३) हिंगोली जिल्हयातील वसमत मतदार संघातील दुर्गम भागात औंढा-नागनाथ तालुक्यातील जवळाबाजार ही मोठी बाजारपेठ असून सदर परिसराच्या पश्चिम बाजूने पूर्णा नदी वाहत आहे, तसेच नदीच्या पलिकडील क्षेत्रात आठ ते दहा गावे येत असून या गावातील लोकांसाठी सुध्दा जवळाबाजार हीच बाजारपेठ असून पूर्णा नदीवर पूल नसल्यामुळे या गावात राहणाऱ्या नागरीकांना जवळाबाजार बाजारपेठेत येण्यासाठी त्रास सहन करावा लागत असल्यामुळे पूर्णा नदीवर पूल बांधण्यात यावा अशी मागणी तेथील लोकप्रतिनिधीनी दि. २३ जानेवारी, २०२१ रोजी मा. सार्वजनिक बांधकाम मंत्री यांचेकडे लेखी पत्राद्वारे केली आहे, हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, पूर्णा नदीवर पूलाच्या बांधकामास शासनाने मंजूरी दिली आहे काय,
(५) असल्यास, केव्हा, अद्याप मंजूरी दिली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व पूलाच्या बांधकामास केव्हा मंजूरी देण्यात येणार आहे?

**श्री. अशोकराव चव्हाण (२१-०२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे. दिनांक २६ डिसेंबर२०२० च्या पत्रान्वये विनंती केली आहे.

(२) प्रश्नांकित काम हे निकष, मंजूरी व निधी उपलब्धततेच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन राहील.

(३) होय, हे खरे आहे.

(४) व (५) सदरचा पूल हा ग्रामिण मार्गावरील असल्याने नाबार्ड योजनेंतर्गत निकष, मंजूरी व निधी उपलब्धततेच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन राहील.

---

**सोलापूर जिल्हयात स्व.गोपीनाथ मुंडे अपघात विमा योजनेच्या लाभास होत असलेल्या दिरंगाईबाबत**

**(३७) ३५८७७ (०७-०१-२०२२). श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.संजयमामा शिंदे (करमाळा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यामध्ये स्व. गोपीनाथ मुंडे अपघात विमा योजना सन २००५-२००६ पासून सुरु करण्यात आली असुन शेती व्यवसाय करताना होणारे अपघात, वीज पडणे, पूर, सर्पदंश, विंचूदंश, विजेचा शॉक बसणे तसेच आपत्तीमुळे होणारे अपघात, रस्त्यावरील अपघात, वाहन अपघात तसेच अन्य कारणांमुळे होणारे अपघात यामुळे शेतकरी कुटूंबियांना मदत करण्याचे या योजनेचे उद्दिष्ट आहे, हे खरे आहे काय.

(२) असल्यास, सोलापूर जिल्ह्यातील सन २०१९-२० या आर्थिक वर्षात एकूण २८८ प्रस्ताव आले असुन त्यापैकी १९४ प्रकरणे मंजूर करण्यात आली असताना कागदपत्रांअभावी ३५ प्रकरणे नामंजूर करण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, माहे डिसेंबर, २०२० ते एप्रिल, २०२१ या कालावधीमध्ये सदर योजनेसाठी जाहीर प्रसिध्दीकरण करण्यात आले नसल्यामुळे खंडीत कालावधीमध्ये जिल्हा कृषी विभागाकडे ९४ प्रकरणे प्रलंबित असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय.

(४) असल्यास, सोलापूर जिल्हयातील अपघातग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत?

**श्री. दादाजी भुसे (०४-०३-२०२२) :** (१) हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

दि.१७.१.२०२२ अखेर पर्यंत सोलापूर जिल्हयांतील सन २०१९-२० मध्ये एकूण २८९ विमा प्रस्ताव प्राप्त होते त्यापैकी २०३ विमा प्रस्ताव मंजूर केले असून ३४ विमा प्रस्ताव नामंजूर केले आहेत व कागदपत्रांअभावी ३७ विमा प्रस्ताव प्रलंबित असून १५ विमा प्रस्ताव विमा कंपनीकडे कार्यवाहीत आहेत.

(३) हे खरे नाही.

गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना सन २०१९-२० या वर्षात दिनांक १० डिसेंबर,

२०१९ ते दिनांक ९ डिसेंबर, २०२० या कालावधीत राबविण्यात आली होती. सदर योजनेची मुदत दि.९.१२.२०२० रोजी संपुष्टात आली आहे. तथापि, प्रशासकीय कारणास्तव सदर योजना निर्धारीत वेळेत सुरु होऊ शकली नाही. त्यामुळे सदर योजनेत दि.१०.१२.२०२० ते दि.६.४.२०२१ असा एकूण ११८ दिवसांचा खंड पडलेला आहे.

शासन निर्णय क्र.शेअवि-२०२१/प्र.क्र.५१/११-अे, दि.२३.८.२०२१ अन्वये खंडीत कालावधीतील पात्र विमा दाव्यांना विशेष बाब म्हणून मंजूरी देण्यात आली आहे. त्यानुसार खंडीत कालावधीतील कोणताही पात्र लाभार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहणार नाही याची कटाक्षाने दक्षता घेण्याचे निर्देश क्षेत्रिय स्तरावर देण्यात आलेले आहेत.

(४) खंडीत कालावधीतील प्रस्तावांना लाभ देण्यासंदर्भात शासन निर्णय दि.१.२.२०२२ नुसार निधी वितरीत करण्यात आला आहे. सोलापूर जिल्ह्यातील जिल्हा स्तरावर छाननी केलेले दि.१०.१२.२०२० ते दि.६.४.२०२१ या खंडीत कालावधीतील ८९ विमा दावे दि.१७.१.२०२२ रोजी कृषि आयुक्तालयास प्राप्त झालेले आहेत. यापैकी पात्र विमा दाव्यांच्या लाभार्थ्यांना आयुक्तालय स्तरावरुन निधी वर्ग करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाअंतर्गत (जि.चंद्रपूर) ताडोबा भवनाचे काम अपुर्णाअवस्थेत असल्याबाबत**

**(३८) ३५९३२ (११-०१-२०२२). श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाअंतर्गत (जि.चंद्रपूर) क्षेत्र संचालक कार्यालय, उपसंचालक कोअर व उपसंचालक बफर ही तिन्ही कार्यालये एकाच इमारतीत आणून "ताडोबा भवन" असे नाव देउन एकत्रित बांधकाम करण्याच्या प्रस्तावास सन २०१९ मध्ये मंजुरी देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कार्यालयाचे बांधकाम निधी अभावी रखडलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ताडोबा भवनाचे अपुर्ण काम पूर्ण करण्यासाठी १८ कोटी निधीचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मागणीच्या अनुषंगाने निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे काय वा विलंबाची कारणे काय ?

**श्री. उद्धव ठाकरे (०३-०३-२०२२) :** (१) हे खरे आहे, ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाअतंर्गत क्षेत्रसंचालक, उपसंचालक कोअर व उपसंचालक बफर ही तीन्ही कार्यालये एकाच इमारीत आणण्याच्या दृष्टिने "ताडोबा भवन" इमारत बांधकामाचे रु.१८०८.०६ लक्ष इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास दिनांक १७.०९.२०१९ च्या शासन निर्णयान्वये मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

(२), (३) व (४) निधी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

## मुंबईतील अरबी समुद्रात आंतरराष्ट्रीय ख्यातीचे शिवस्मारक उभारणीचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(३९) ३६०४४ (११-०१-२०२२). श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील अरबी समुद्रात उभारावयाच्या आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या शिवस्मारकाचे उभारणीचे काम माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये कंत्राटदार एल अँन्ड टी कंपनीला (L&T) कामाची वर्क ऑर्डर देण्यांत येऊन ते काम करारनाम्यानूसार ३६ महिन्यांत पूर्ण करण्यांत येणार होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर स्मारकाचे काम मागील दोन-अडीच वर्षातील कोरोना काळ व अन्य कारणांमुळे पुर्ण होऊ न शकल्यामुळे छत्रपती शिवाजी महाराज स्मारक प्रकल्प समितीने स्मारकाचे कामासाठी सध्याच्या निविदेच्या रक्कमेत भाववाढ न करता ठेकेदार कंपनीला १ वर्षाची मुदतवाढ देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे पाठविला असल्याचे दि. २३ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यासंदर्भातील महालेखापरीक्षकांचे आक्षेपांची पुर्तता व प्रकल्प समितीने पाठविलेला प्रस्ताव विचारात घेता स्मारकाचे काम गतीने होण्याचे दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली अथवा करण्यांत येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय?

**श्री. अशोकराव चव्हाण (२१-०२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे दि.११/०१/२०१९ पासून काम बंद आहे. कामाची मुदत दि.१८/१०/२०२१ रोजी संपत असल्याने न्यायालयीन स्थगिती व कोविद-१९ चा प्रादुर्भाव बघता कंत्राटदार मे.एल.अँड.टी.लि. यांना कोणतीही भाववाढ न देता एक वर्षासाठी दि.१८.१०.२०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

(३) महालेखाकारांच्या नियमीत लेखापरिक्षणावेळी उपस्थित केलेल्या लेखाआक्षेपांचे अनुपालन विहित कार्यपध्दतीप्रमाणे करण्यात आले आहे. न्यायालयीन आदेशाच्या अनुषंगाने पुढील आवश्यक कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही

---

## (ता.हिंगणा, जि.नागपूर) येथील बाजारबांव, चिचोली, येरणगांव रस्त्याचे काम निकृष्ठ दर्जाचे झाल्याबाबत

**(४०) ३६१७० (११-०१-२०२२). श्री.समिर मेघे (हिंगणा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हयातील हिंगणा तालुक्यातील बाजारबांव, चिचोली, येरणगांव रस्ता रा.मा.क्र. ३३६ सुधारणा कि.मी. ४९/३०० ते ५९/७०० मंजूर तरतूद रु. ५ कोटी व मिहान, हिंगणा, उखळी, जुनेवाणी, मांडवघोराड रस्ता प्रजिमा १०८ विशेष दुरुस्ती काम हे निकृष्ठ दर्जाचे झाल्याचे निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंत्राटदाराने कि.मी. ५३/० ते ५७/० या रस्त्याचे खोदकाम करुन सुमारे एक वर्षापासून अर्धवट स्थितीत आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची योग्य चौकशी केली काय, त्यात काय आढळून आले व दोषीवर कोणती कार्यवाही कली वा करण्यांत येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती?

**श्री. अशोकराव चव्हाण (२१-०२-२०२२) :** (१) हे खरे नाही.

(२) (३) व (४) बाजारगांव, चिचोली, येरणगांव या रस्त्याची सुधारणा करणे व खापरी मिहान (हद्द) हिंगणा, जुनेवाणी, मांडवघोराड ते रा.मा. ३२५ रस्त्याची दुरुस्ती करणे, या दोन्ही कामांच्या भौतीक प्रगतीवर करोनाच्या प्रादुर्भावामुळे अंशत: परिणाम झाला आहे. तथापी सद्यस्थितीत हि कामे प्रगतीत असून मार्च, २०२२ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

---

**(ता.हिंगणा, जि.नागपूर) पाटणसावंगी, भरतवाडा, फेटरी, हिंगणा रामा ३४६ वरील लाव्हा, बोढाळा रस्त्याचे बांधकामासाठी भुसंपादन करण्याबाबत**

**(४१) ३६१७१ (११-०१-२०२२). श्री.समिर मेघे (हिंगणा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर हिंगणा ग्रामीण तालुक्यातील पाटणसावंगी, भरतवाडा, फेटरी, हिंगणा रामा ३४६ वरील लाव्हा, बोढाळा रस्त्याचे बांधकामासाठी खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी पध्दतीने भुसंपादन करण्यात आले असून ३२ कोटीचा निधी सार्वजनिक बांधकाम विभाग नागपूर यांना उपलब्ध करुन दिला नसल्याचे निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रभावीत भुधारकाकडून संपादीत जमिनीच्या मोबदल्या रकमेची वारंवार मागणी केली हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची योग्य चौकशी केली काय,त्यात काय आढळून आले आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती?

**श्री. अशोकराव चव्हाण (२३-०२-२०२२) :** (१), (२), (३) व (४) सदर भुसंपादन प्रकरण सन १९९६ म्हणजेच २५ वर्ष जुने आहे. जिल्हाधिकारी नागपूर यांनी थेट वाटाघाटी पध्दतीने निवाडा दि.११.१.२०२१ रोजी मंजूर केला आहे. त्यानुसार, शासनाने दि.१.३.२०२१ च्या शासन निर्णयान्वये भुधारकांना भुसंपादनाकरीता रु.३२.०० कोटी रक्कमेची प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे. सदर प्रकरणी शासनाने रू.३.०० कोटी इतका निधी वितरीत केला आहे. थेट वाटाघाटीने संपादित जमिनीची खरेदी करून भुधारकास संपादित जमिनीचा मोबदला देण्याबाबत आवश्यक कार्यवाही प्रगतीत आहे.

---

**(ता.दारव्हा, जि. यवतमाळ,) वन परिक्षेत्रात**
**अवैध वृक्षतोड होत असल्याबाबत**

**(४२) ३६२२७ (२३-११-२०२१). श्री.मदन येरावार (यवतमाळ), श्री.नामदेव ससाने (उमरखेड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयातील दारव्हा तालुक्यात वन परिक्षेत्रातील पाथ्रड, वडगाव, महातोली, उचेगाव, करसगाव, धामणगाव, बोदेगाव, कुंभारकिन्ही, मागकिन्ही, बोथ, पळशी, लाख इत्यादी बिटमध्ये आंबा, निंब, काटसावर, बाभूळ, अजन आदी वृक्षांची छाटणी केली जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्याच्या शेतातील आडजात वृक्ष तोडण्यासाठी वनविभागाची परवानगी असने गरजेचे असतांना सुध्दा मात्र, ठेकेदार कुठलेली परवानगी न काढता अवैध वृक्ष तोड करीत आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, वृक्षतोडी संदर्भात वन व महसूल अधिनियमानुसार काही नियम घालून दिले असतांना सदर प्रकार बिटमधील संबंधित क्षेत्र सहाय्यकांना माहित असूनही कुठलीच कारवाई होत नसल्याने अधिकाऱ्यासोबत लाकूड तस्करांचे हितसंबंध असल्याचे लक्षात येते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, तब्बल ५ ते ६ महिन्यांपासून लाकूड तस्करांनी शेतकऱ्याच्या नावावर ई-क्लास, वन परिक्षेत्रातील वृक्षांची कत्तल केल्यामुळे पर्यावरणाला धोका निर्माण झाला आहे, हेही खरे आहे काय,

(५) असल्यास, शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात येत आहे?

**श्री. उद्धव ठाकरे (०६-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) शेतकऱ्यांनी शेतात अवैध वृक्षतोड केल्यास महाराष्ट्र वृक्षतोड अधिनियम, १९६४ अंतर्गत कारवाई केली जाते.

(३) अवैध वृक्षतोडीची घटना निदर्शनास आल्यास वेळोवेळी कारवाई करण्यात आलेली आहे.

(४) लाकूड तस्करांनी शेतकऱ्यांच्या नावावर ई क्लास वनपरिक्षेत्रातील वृक्षांची तोड केल्याची घटना निदर्शनास आलेली नाही.

(५) अवैध वृक्षतोडीस प्रतिबंध करण्याकरीता वन विभागामार्फत नियमितपणे गस्त घातली जाते. त्याचप्रमाणे वनपरिक्षेत्रातील नियतक्षेत्राची नियमितपणे तपासणी केली जाते. तपासणी व गस्त दरम्यान अवैध वृक्षतोड आढळून आल्यास नियमाप्रमाणे वनगुन्हा जारी करुन चौकशी केली जाते. अवैध वृक्षतोडीची बाब निदर्शनास आल्यास महाराष्ट्र वृक्षतोड अधिनियम, १९६४ अंतर्गत कारवाई केली जाते.

---

## पुणे जिल्ह्यात दिशादर्शक फलकांवरून गड-किल्ल्यांची नावे गायब झाल्याबाबत

**(४३) ३६२८० (११-०१-२०२२). श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील सिंहगड राजगड तोरणा किल्ला जवळच्या अंतराने जोडण्यासाठी सुमारे सव्वा दोनशे कोटी रुपये खर्च करून तयार करण्यात येत असलेल्या बहुचर्चित पुणे पानशेत सिंहगड भागातील रस्त्यांवर लावण्यात आलेल्या दिशादर्शक फलकां वरून गडकिल्ल्यांचा ऐतिहासिक स्थळांची नावे च गायब झाली हे खरे आहे का,

(२) असल्याचे, दिनांक १८ सप्टेंबर, २०२१ रोजी व त्या सुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे पर्यटक तसेच नवख्या प्रवाशांना किल्ले तसेच पानशेत व इतर ठिकाणे कोणत्या दिशेला व किती अंतरावर आहेत हे समजत नाही हे खरे आहे काय,

(४) असल्यास, रस्त्यांवर लावण्यात आलेल्या दिशादर्शक फलक दुरुस्ती बाबत विलंबाचे कारण काय?

**श्री. अशोकराव चव्हाण (२१-०२-२०२२) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

(४) सिंहगड, राजगड, तोरणा या किल्ल्यांकडे जाणा-या रस्त्यांच्या काही लांबीमध्ये रुंदीकरण व मजबुतीकरणाचे काम पूर्ण झाले आहे. त्याठिकाणी दिशादर्शक फलक लावण्यात आलेले आहेत. व उर्वरित लांबीमध्ये काम पूर्ण झाल्यानंतर दिशादर्शक फलक बसविण्याचे नियोजन आहे.

---

## कोरोना महामारीच्या पार्श्वभूमीवर शासनाने स्थगित केलेल्या राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षा लवकरात लवकर घेण्याबाबत

**(४४) ३६३०५ (११-०१-२०२२). श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोना महामारीच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षा स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोना महामारीच्या पार्श्वभूमीवर अभ्यासिका, मार्गदर्शन केंद्र आणि अभ्यास वर्ग सुरू करण्यात आलेले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, परीक्षांचे वेळापत्रक कोलमडल्याने व स्थगित असलेल्या परीक्षा प्रक्रिया सुरू होत नसल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कोरोना महामारीच्या पार्श्वभूमीवर शासनाने स्थगित केलेल्या राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षा लवकरात लवकर घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. उद्धव ठाकरे (०९-०२-२०२२) :** (१) राज्य शासनाने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या राज्यसेवा पूर्व परीक्षा २०२० व महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट-ब संयुक्त पूर्व परीक्षा-२०२० करोनाच्या पार्श्वभूमीवर पुढे ढकलण्याबाबत निर्णय घेतला आहे.

(२) कोरोना विषाणूच्या पार्श्वभूमीवर प्रशिक्षण केंद्रावरील प्रत्यक्ष अभ्यासिका व वसतिगृह इत्यादी सुविधा विद्यार्थ्यांकरीता तात्पुरत्या स्वरुपात बंद ठेवण्यात आल्या आहेत, तथापि, प्रशिक्षणार्थ्यांकरीता ऑनलाईन प्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

(३) स्थगित केलेल्या परीक्षा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून राज्यसेवा पूर्व परीक्षा २०२० व महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट-ब संयुक्त पूर्व परीक्षा-२०२० ह्या अनुक्रमे दिनांक २१.३.२०२१ रोजी दिनांक ४ सप्टेंबर, २०२१ रोजी घेण्यात आल्या.

(४) महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सन २०२२ मध्ये घेण्यात येणा-या स्पर्धा परीक्षांचे अंदाजित वेळापत्रक आयोगाने त्यांच्या संकेतस्थळावर दि. ४.१२.२०२१ रोजी प्रसिध्द केले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात खेळाडूंची गुणवत्ता वाढविण्याकरीता जिल्हा क्रीडा अधिकारी पदे भरण्याबाबत**

**(४५) ३६४६० (१०-०१-२०२२). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात खेळाडूंची गुणवत्ता वाढविण्याबाबत प्रत्येक जिल्ह्यांमध्ये क्रीडा अधिकारी कार्यालय सुरु करण्यात आले असून जिल्हा क्रीडा अधिकारी या रिक्त पदांची भरती प्रक्रिया रखडल्याचे दिनांक २ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासमुारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रिक्त पद भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुनिल केदार (०२-०३-२०२२) :**(१) व (२) जिल्हा क्रीडा अधिकारी संवर्गातील सरळसेवा कोट्यातील अ.ज. प्रवर्गाचे १ पद वगळता अन्य पदे भरलेली आहेत, तसेच पदोन्नती कोट्यातील रिक्त पदे भरण्यासंदर्भात कार्यवाही सुरू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अंबेजोगाई (ता.केज, जि.बीड) येथील रस्त्याच्या देखभाल दुरूस्तीबाबत**

**(४६) ३६५०५ (१७-०१-२०२२). श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबेजोगाई जि.बीड यांनी माजलगाव धारूर व केज तालुक्यातील रस्त्याच्या दोन वर्षासाठी देखभाल दुरूस्ती करण्यासाठी मे. न्यु गुरूकृपा कन्स्ट्रक्शन, अंबेजोगाई जि बीड यांना दि. २७ मार्च, २०२० रोजी कार्यारंभ आदेश दिला आहे काय,

(२) असल्यास, माजलगाव व धारूर तालुक्यातील रस्त्याची दुरूस्ती न करता व या दोन्ही उपविभागाच्या अधिकार्याची एम.बी. व देयकावर सही न घेता संबंधित एजन्सीस बिल अदा केले हे खरे आहे काय,

(३) सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबेजोगाई जि.बीड अंतर्गत योजनेतून झालेल्या कामामध्ये सन २०१८-१९ व २०१९- २० या आर्थिक वर्षात आर्थिक अनियमतताअसल्यास, या प्रकरणी दोषी अधिकारी व एजन्सी यांच्या विरुद्ध काय कार्यवाही करण्यात आली आहे तसेच सा.बां. विभाग, अंबेजोगाई जि.बीड यांनी सन २०१९- २० मधिल बी- १ निविदा क्रं.११३, ११४, ११५ अन्वेय दिंद्रुड ता. माजलगाव जि.बीड येथील पो.स्टे. च्या दुरूस्ती कामासाठी कृष्णा अनंत दौंड सु.बे.अ. यांना कार्यारंभ आदेश दिले हे खरे आहे का,

(४) असल्यास, या प्रकरणी दोषी अधिकारी व एजन्सी यांच्या विरुद्ध काय कार्यवाही करण्यात आली आहे,

(५) नसल्यास, विलंबाची काय कारणे आहेत?

**श्री. अशोकराव चव्हाण (२४-०२-२०२२) :** (१) होय हे खरे आहे.

(२) रस्त्यावरील दूरस्तीची कामे करुन देयके अदा करण्यात आली आहेत.

(३) प्रश्नाकिंत कालावधीत विविध योजनेतंर्गत हाती घेण्यात आलेल्या कामात कोणतीही आर्थिक अनियमितता झालेली नाही.

तसेच, प्रश्नातील मुद्दयामध्ये नमूद केलेल्या कामांच्या दुरुस्तीसाठी कृष्णा अनंत दौंड सु.बे.अ. यांना कार्यारंभ आदेश दिले आहेत, हे खरे आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बार्शी ते सोलापूर (ता.जि. सोलापूर) या रस्त्याच्या दुरुस्तीचे व डागडूजीचे काम संथ गतीने सुरु असल्याबाबत**

**(४७) ३६५४४ (१७-०१-२०२२). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बार्शी ते सोलापूर (ता.जि. सोलापूर) या रस्त्याच्या दुरुस्ती व डागडूजीचे काम संथगतीने सुरु असून रस्ता नादुरुस्त असल्याने अपघात मृत्यू झाल्याची घटना माहे सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निर्दशनास आली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, प्रस्तुत प्रकरणी होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (२३-०२-२०२२) :** (१) हे खरे नाही.

(२), व (४) सदर रस्ता रा.मा. २०४ कि.मी. १/४०० ते ६३/३०० इतकी लांबीच्या सुधारणेचे काम आशियाई अर्थसहाय्य बँक या योजनेअंतर्गत मंजूर असून काम प्रगतीपथावर आहे.

सद्यस्थितीत जवळपास ७०% इतके काम पुर्ण झालेले आहे. उर्वरित काम हे साधारणता मे २०२२ पर्यंत पुर्ण होईल. सद्यस्थितीत रस्ता वाहतुकीसाठी सुस्थितीत आहे.

---

**इंद्र गणेश हाईटस त्रिमुर्ती रोड, चुनाभट्टी (मुंबई) या सोसायटीवर दरोडा टाकून दरोडेखोरांनी लाखांचा ऐवज व रोख रक्कम चोरल्याबाबत**

**(४८) ३६५८० (१०-०१-२०२२). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इंद्र गणेश हाईटस, त्रिमुर्ती रोड, चुनाभट्टी (मुंबई) या सोसायटीवर दरोडा टाकून दरोडेखोरांनी रुपये ५० लाखांची ऐवज व रोख रक्कम चोरल्याची घटना दिनांक २९ डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास घडल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घटना घडल्यानंतरही माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान पोलीस चोरीचा शोध लावू शकले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, तद्नुसार चौकशीत काय निष्पन्न झाले आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (०३-०३-२०२२) :** (१), (२) व (३) बृहन्मुंबई पोलीस अधिपत्याखालील चुनाभट्टी पोलीस ठाणे हद्दीत इंद्र गणेश हाईट्स, त्रिमूर्ती रोड, मुंबई या सोसायटीवर दिनांक २९/१२/२०२० रोजी दरोडा टाकून दरोडेखोरांनी ५० लाखांचा ऐवज व रोख रक्कम चोरल्याची घटना घडलेली नाही. परंतु दिनांक ३०/०३/२०२१ रोजी सकाळी १०.०० ते १९.०० वाजताच्या दरम्यान श्री.मनीष गजानन म्हात्रे, फ्लॅट नंबर १४०३ व १४०१, इंद्र गणेश हाईट्स, चुनाभट्टी, मुंबई यांच्या घरी घरफोडी होऊन घरातील सोन्याचे दागिने व रोख रक्कम अशी एकूण रु.१७,१८,०००/- लक्ष इतकी मालमत्ता चोरी झाली आहे. सदर प्रकरणी चुनाभट्टी पोलीस ठाणे, मुंबई येथे गु.र.क्र. ८९/२०२१ कलम ३८०, ४५४ भा.द.वि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

घरफोडीच्या गुन्ह्यांमध्ये करण्यात येणाऱ्या तपासाच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे नमूद गुन्ह्याचा तपास चालू आहे. आरोपींचा सर्वतोपरी शोध घेण्याचा प्रयत्न चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मिरज (जि.सांगली) येथील शासकिय दूध डेअरीला दूध पुरवठा करण्याबाबत**

**(४९) ३६५८८ (०७-०१-२०२२). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरज (जि.सांगली) येथील शासकिय दूध डेअरीला मागील १० वर्षापासून दूध पुरवठा होत नसल्याचे माहे ऑक्टोंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन १९६५ मध्ये शासनाने कोटयावधी रुपये खर्च करुन यंत्रसामुगी घेऊन सुरु केलेल्या दुध डेअरीमध्ये कर्मचारी कार्यरत नसल्यामुळे दूध उत्पादने तयार करण्यासाठी लागणारी यंत्र सामुग्री बिनावापर पडुन असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, मिरज येथील शासकिय दुध डेअरीला दुध पुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुनिल केदार (०२-०३-२०२२) :** (१) हे खरे आहे.
(२) मिरज येथील यंत्रसामुग्री २५ ते ३० वर्षापुर्वी खरेदी केली असल्याने ती कालबाहय व आयुष्यमान संपले असल्याने वापरात नाही.
(३) व (४) केंद्र शासनाचे खुल्या आर्थिक धोरणाचे अनुषंगाने शासनाने दुग्धव्यवसायातून टप्या टप्याने बाहेर पडून सहकार / खाजगी क्षेत्रास दूधव्यवसायाकरीता प्राधान्य दिल्याने सदर क्षेत्राचे बळकटीकरणास चालना दिली आहे. त्यामुळे नव्याने शासनाकडून कार्यवाही करण्याची बाब लागु होत नाही.

---

**सांगली जिल्हयातील कवलापूर येथे विमानतळाची तब्बल १५० एकर जागा पडून असल्याबाबत**

**(५०) ३६६०६ (१७-०१-२०२२). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली जिल्हयातील कवलापूर येथे विमानतळाची तब्बल १५० एकर जागा कित्येक वर्षे तशीच पडून असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या जागेवर सध्या कच-यांचे, मुरुमाचे साम्राज्य झाले आहे हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, या जागेवर विमानतळ बांधण्याबाबतची सद्यस्थिती काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उद्धव ठाकरे (०९-०२-२०२२) :** (१), (२) व (३) सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय क्र.एव्हीएन/प्र.क्र.५८७/०९/२८अ, दि.२६.१०.२००९ अन्वये कवलापूर, जि.सांगली येथील विमानतळ त्याच्या विकास/विस्तारसाठी येत असलेल्या अडचणी विचारात घेऊन बंद करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. सदर विमानतळ धावपट्टी अंतर्गत शासकीय एकूण ६६.५६ हेक्टर जमीन व्यवस्थापन आणि देखभालीसाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अखत्यारित राहील. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडाळाने सदर जमीन अतिक्रमणमुक्त ठेवणेबाबत व्यवस्था करावी, असाही निर्णय उपरोक्त शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे.

सदरची जागा पड व मुरमाड स्वरुपाची आहे. सदरची जागा वहिवाटीत नसल्यामुळे झाडेझुडपे उगवली आहेत. तसेच सदरची जागा गावठाणास लागूनच असल्याने गावठाणालगतचे लोक घरगुती कचरा टाकत आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.